# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२६३ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२२ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## संसदेत घुसखोरी झाली, तेव्हा भाजपा खासदार पळून गेले, राहुल गांधींचा खोचक टोला

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसदेचे हिवाळी अधिवेशन संपले, पण खासदारांच्या निलंबनावरुन संघर्ष सुरुच आहे. या विरोधी खपवळर आघाडी आज देशभरात निषेध करत आहे. राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे मुख्य निदर्शने करण्यात आली. सर्व विरोधी पक्षांचे नेत्यांनी एकत्र येत सरकारवर जोरदार टीका केली. यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

'त्या तरुणांनी संसदेत इतके मोठे कृत्य करणाचे कारण देशातील बेरोजगारी आहे. याबाबत आम्ही गृहमंत्र्यांशी प्रश्न विचारला, तर त्यांनी दीडशे खासदारांची हकालपट्टी केली. प्रत्येक खासदार लाखो मते घेऊन येतो, तुम्ही १५० लोकांचा अपमान केला नाही, तर ६० टक्के भारतातील लोकांना गप्प केले. तुम्ही अग्निवीर योजना आणली आणि तरुणांच्या मनातून देशभक्तीची भावना निघून गेली. अग्निवीरच्या विरोधात तरुण उभे राहिले, तेव्हा सरकारी नोकरी मिळणार नाही, असा दम दिला. आम्ही सर्व विरोधी पक्षाचे नेते एकत्र आहोत. ही लढाई द्वेष आणि प्रेम यांच्यात आहे. आम्ही द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान उघडतोय. तुम्ही जितकं लोकांना घाबरवाल, तितकी इंडिया आघाडी मजबूत होईल,' असंही राहुल यावेळी म्हणाले.



### देशात तीव्र बेरोजगारी

संसद सुरक्षेतील त्रुटीचा मुद्दा उपस्थित करत राहुल गांधी म्हणाले की, 'हा मुद्दा संसदेच्या सुरक्षेचा आहे, पण त्या तरुणांनी हे कृत्य का केले? याचे कारण बेरोजगारी आहे. देशात तीव्र बेरोजगारी आहे, त्यामुळे तरुणांना रोजगार मिळू शकत नाहीय. मी एक छोटासा सर्व्हे करायला सांगितला होता. भारतीय तरुण दिवसातील किती तास मोबाईल फोनवर घालवतात, ते शोधण्यास सांगितले होते. यातून असे समजले की, देशातील तरुण दिवसाचे साडेसात तास फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, मेल, म्हणजे स्मार्टफोनवर घालवतोय. याचा अर्थ मोदी सरकारच्या काळात त्यांना रोजगार मिळालाच नाही. यामुळे त्या तरुणांनी संसदेच्या सभागृहात प्रवेश केला.'

### संसदेच्या सुरक्षेबाबत सरकारला घेरले

खासदारांच्या निलंबनाचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले की, 'काही दिवसांपूर्वी दोन-तीन तरुणांनी संसद भवनात उड्या मारल्या, आम्ही सर्वांनी त्यांना उडी मारताना पाहिले. ते आत आले, धुराच्या नळकांड्या फोडल्या, यावेळी भाजपचे सर्व खासदार पळून गेले. जे स्वतःला देशभक्त म्हणवतात, त्यांची हवा टाईट झाली.'

## खाद्यतेल तेलांच्या किमती वाढणार नाहीत, सरकारने एका वर्षासाठी आयात शुल्क कमी केले

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

केंद्र सरकारने महागाई कमी करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. सरकारने एका वर्षासाठी खाद्यतेल तेलांच्या आयातीवरील कर कमी केले आहेत. यामुळे, खाद्यतेल तेलांच्या किंमती नियंत्रित केल्या जातील. यामुळे महागाईव कमी होण्यास मदत होईल. येत्या काही दिवसात खाद्यतेलाच्या किमती कमी होणार आहेत.

सरकारने रिफायंड सोयाबीन तेल आणि सूर्यफूल तेलाचे आयात शुल्क १७.५ टक्क्यांवरून १२.५ टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. हा निर्णय मार्च २०२४ पर्यंत लागू करण्यात आला. अधिकृत माहितीनुसार, आता या निर्णयाची शेवटची तारीख मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

गहू, तांदळाच्या दरात दिलासा मिळणार? किमती नियंत्रित ठेवण्यासाठी सरकारने ३.५ लाख टन गहू विकला. मूलभूत आयात शुल्क कोणत्याही वस्तूची किंमत निश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. खाद्यतेल तेलांच्या आयातीपासून ही फी कमी केल्यास घरगुती बाजारात त्यांच्या किंमती नियंत्रित करण्यात



मदत होईल. एका वर्षात आयात शुल्क वाढल्यामुळे, देशांतर्गत बाजारात खाद्यतेल तेलांच्या किंमती वाढणार नाहीत आणि ग्राहकांना त्याचा फायदा होईल. हे महागाई नियंत्रित करण्यात मदत करेल.

भारत जगातील दुसर्या क्रमांकाचे खाद्यतेल तेल ग्राहक आहे, त्याशिवाय खाद्य तेलांच्या आयातीमध्ये हे जगातील पहिले आहे. देशाच्या एकूण गरजा ६० टक्के आयातीद्वारे पूर्ण केल्या जातात. पाम तेलाचा एक मोठा भाग इंडोनेशिया आणि मलेशियामधून आयात केला जातो. भारतातील सर्वाधिक वापर म्हणजे मोहरीचे तेल, सोयाबीन आणि सूर्यफूल तेलाचा आहे.

## आम्ही लोकसभेच्या २३ जागा लढवणारच राऊतांचा दावा; वडेट्टीवारांचं चोख प्रत्युत्तर

**दि. २२विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

लोकसभा निवडणुका जवळ येऊ लागल्याने राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीतही जागावाटपावरून खलबतं होण्यास सुरुवात झाली आहे. काँग्रेस नेत्यांकडून जागावाटपाबाबत विविध दावे केले जात असतानाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी आक्रमकपणे भूमिका मांडत आम्ही लोकसभेच्या २३ जागा लढवणार असल्याचं घोषित केलं आहे. तसंच जागावाटपाची चर्चा राज्यातील काँग्रेस नेत्यांसोबत होणार नसून हायकमांडसोबत होईल, असंही राऊत यांनी पत्रकार परिषदेत बोलताना स्पष्ट केलं.



राज्यातील काँग्रेस नेत्यांना फटकारत संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे जेव्हा दिल्लीत आले होते, तेव्हा आम्ही सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे आणि के. सी. वेणुगोपाल यांच्यासोबत अर्धा तास महाराष्ट्राच्या राजकीय स्थितीवर चर्चा केली. या चर्चेत काय घडलं हे फक्त आम्हालाच माहीत आहे. राज्यातील काँग्रेस नेत्यांना त्याबद्दल माहिती नसावी. लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील जागावाटपाची चर्चा महाराष्ट्र काँग्रेसमधील नेत्यांसोबत होणार नसून ती दिल्लीत होईल. आम्ही २३ जागा लढवणार आहोत, हे आम्ही दिल्लीतील काँग्रेसच्या नेत्यांना स्पष्ट सांगितलं आहे. काँग्रेस हायकमांडसोबत आमचे संबंध अत्यंत मधूर आहोत, असं राऊत यांनी म्हटलं आहे.

संजय राऊत यांनी लोकसभेच्या जागावाटपावर भाष्य करताच काँग्रेस नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पक्षाची भूमिका जाहीर केली आहे. कोण किती जागा लढणार, हा वादाचा विषय होऊ शकत नाही. ज्याची जिथे ताकद आहे, तो पक्ष ती जागा लढवेल. हा निर्णय हायकमांडच घेणार आहे. जागावाटपासाठी अद्याप प्राथमिक चर्चेची फेरीही झालेली नाही. त्यामुळे संख्येचा प्रश्न आला कुठे? काहीतरी वावड्या उठवून आपसांत भांडण लावायचा हा विरोधकांचा प्रयत्न आहे, असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीची संयुक्त बैठक होण्याआधीच संजय राऊत यांनी आपला पक्ष किती जागा लढवणार हे जाहीर करून टाकल्याने महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे. राऊत यांच्या या दाव्यावर काँग्रेसनंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून काय प्रतिक्रिया दिली जाते, हे पाहावं लागेल.

## भाजपाची हॅट्रिक करण्याची तयारी! दोन दिवसांच्या बैठकीत 'मिशन २०२४' साठी ठरवली जाणार रणनीती

**दि.२२विदर्भ नवी दिल्ली**

संसदेचे हिवाळी अधिवेशन संपताच भाजपाने मिशन-२०२४ ची तयारी सुरू केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात भाजपाने २२ आणि २३ डिसेंबर रोजी दिल्लीतील पक्ष मुख्यालयात एक मोठी बैठक बोलावली आहे. या बैठकीत सर्व प्रदेशाध्यक्ष, संघटनेचे सरचिटणीस, राष्ट्रीय अधिकारी आणि देशभरातील सर्व मोर्चांचे अध्यक्ष सहभागी होणार आहेत. या बैठकीनंतर संघटनेच्या महामंत्र्यांची बैठक होणार आहे. यादरम्यान 'विकसित भारत संकल्प मोहिमे'चा आढावा घेतला जाईल. तसेच, आगामी लोकसभा निवडणुकीत ३२५ जागा जिंकण्याची रणनीती ठरवली जाणार आहे. देशात सत्तेची हॅट्रिक साधून इतिहास रचण्याचा भाजपाचा इरादा आहे, त्यासाठी नियोजनही बैठकीत करण्यात येणार आहे.



भाजपाच्या बैठकीत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला धार देण्याची रणनीती आखली जाणार असून प्रदेश संघटनेच्या नेत्यांना काम दिले जाणार असल्याचे म्हटले जाते. भाजपाने २०२४ मध्ये ३२५ हून अधिक जागांचे लक्ष्य ठेवले आहे, जे साध्य करण्यासाठी पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा यांनी अवघ्या दोन दिवसांत बैठक बोलावली आहे. लोकसभा निवडणूक, विकास भारत संकल्प अभियान, सर्व आघाड्यांचे काम, विधानसभा निवडणुकीचा आढावा यासह अनेक मुद्द्यांवर चर्चा होणार असल्याचे भाजपकडून सांगण्यात आले. जेपी नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंह यांनी जारी केलेल्या कार्यक्रमानुसार, शुक्रवारी राष्ट्रीय अधिकारी, प्रदेश प्रभारी, सहप्रभारी, प्रदेशाध्यक्ष, प्रदेश सरचिटणीस आणि सर्व आघाड्यांचे अध्यक्ष यांची बैठक होणार आहे.

शनिवारी प्रदेश सरचिटणीस (संघटन) यांची बैठक रात्री नऊ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. यापूर्वी १९ डिसेंबर रोजी भाजपने संसदीय समितीची बैठक बोलावली होती. संसदेच्या लायब्ररी परिसरात ही बैठक झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि जेपी नड्डा या बैठकीला उपस्थित होते. भाजपा मुख्यालयात पक्षश्रेष्ठींच्या दोन दिवसीय उच्चस्तरीय बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीबाबत प्रदेश संघटनेच्या नेत्यांकडून अभिप्राय घेण्यात येणार आहे. २४ डिसेंबरला वीर बाल दिवस आणि २५ डिसेंबरला अटल जयंतीच्या तयारीवरही या बैठकीत चर्चा होणार आहे. या बैठकीत निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या प्रशिक्षणाचा विस्तार आणि कॉल सेंटर आणि फ्रंटच्या नियोजनाबाबतही चर्चा होणार आहे.

### ३२५ पेक्षा जास्त जागा जिंकण्याचे भाजपाचे लक्ष्य

देशातील पाच राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतर भाजपाचा आत्मविश्वास उंचावला आहे. मध्य प्रदेशात सरकार वाचवण्यात पक्षाला यश आले, तर राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसचा पराभव करून ते सत्तेवर आले. अशा परिस्थितीत भाजपाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ३२५ पेक्षा जास्त जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे, तर २०१९ मध्ये पक्षाने ३०३ जागा जिंकल्या होत्या. मिशन-२०२४ जिंकण्यासाठी नरेंद्र मोदींपासूनअमित शाह यांचे दौरे सुरू आहेत.

## इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर नितीश कुमार नाराज; राहुल गांधींकडून समजूत काढण्याचा प्रयत्न

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून १९ डिसेंबर रोजी दिल्लीत झालेल्या विरोधी पक्षांच्या भारत आघाडीच्या चौथ्या बैठकीनंतर नाराजीनाट्याला सुरुवात झाली आहे. बैठकीनंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्याशी



प्रथमच संवाद साधला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फोन संभाषणात राहुल गांधी आणि नितीश कुमार यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा केली आणि इंडिया ब्लॉक मजबूत करण्याबाबत चर्चा केली.

जेडीयूच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नितीश यांच्याशी झालेल्या संभाषणात राहुल यांनी ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल यांनी विरोधी पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून मल्लिकार्जुन खर्गे यांच्या नावावर काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. इंडिया आघाडीच्या बैठकीत तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी अचानक खर्गे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला होता.

## 'देवही ज्यांना घाबरतो, त्या जरांगेंना सरकारने वेठीस धरलंय', छगन भुजबळ यांची उपरोधिक टीका

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक नाशिक**

ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण द्यावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील आंदोलन करत आहेत. तर दुसऱ्या बाजूला राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण देण्यास विरोध केला. दोन्ही नेत्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून शाब्दिक वाकयुद्ध रंगल्याचे महाराष्ट्राने पाहिले. एकमेकांना अरे-तुरे करेपर्यंत हा वाद पोहोचला होता. मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला २४ डिसेंबरचा अल्टीमेटम दिला असून आता पत्नीकडील नातेवाईकांना आरक्षण देण्याची त्यांनी मागणी केली आहे. काल (दि. २१ डिसेंबर) सरकारचे शिष्टमंडळ अंतरवाली सराटी येथे जाऊन जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधत होते. पण ही चर्चा निष्फळ ठरली. त्यावरून छगन भुजबळ यांनी आज पत्रकार परिषद घेऊन जरांगे पाटील यांच्यावर उपरोधिक टोलेबाजी केली. जरांगे यांच्या मनात रोज नवनवीन कल्पना येतात. त्यावर सरकारने लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी करतो असे भुजबळ यावेळी म्हणाले.

### देवही जरांगेंना घाबरतो

जरांगे पाटील यांच्या मागण्या तर्काला धरून



आहेत, नियमाला धरून आहेत. सरकारच त्यांचे काही ऐकत नाही, असे चित्र निर्माण झालेले दिसते. जरांगेच्या मागण्या तात्काळ मान्य केल्या पाहीजेत. जरांगेनी सरकारला वेठीस धरले आहे, असा प्रश्न माध्यमांनी विचारला असता भुजबळ म्हणाले की, जरांगेनी सरकारला वेठीस धरलेले नाही तर सरकारनेच जरांगेना वेठीस धरले आहे. तसेच मी याआधी केलेली माझी सर्व भाषणे मागे घेत असून जरांगेच्या अभिनव कल्पनांना मान्यता देत आहे. कायदे बदलून टाकावेत. पुढच्या मेळाव्यात मी त्यांच्याबाजूने भाषणे करणार आहे, असा उपरोधिक टोला भुजबळ यांनी लगावला.

## काँग्रेस नेते सुनिल केदार यांना ५ वर्षांची शिक्षा

**दि. २२ विदर्भ प्रजासत्ताक नागपुर**

नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणी काँग्रेसचे नेते सुनिल केदार यांना मोठा धक्का बसला आहे. कोर्टाने त्यांना दोषी ठरवल्यानंतर शिक्षाही सुनावली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १५० कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी सुनिल केदार आणि इतर दोषींना ५ वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. कोर्टानं सुनील केदार ( तत्कालीन बँक अध्यक्ष) यांच्यासोबत केतन शेठ अशोक चौधरी या तिघांसह आणखी तिघे रोखे दलाल अशा एकूण सहा जणांना दोषी ठरवलं होते.

## उद्धव ठाकरेंना राम मंदिर उद्घाटन सोहळ्याचे निमंत्रण नाही; संजय राऊत संतप्त

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

अयोध्या येथे २४ जानेवारी रोजी राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार असून या सोहळ्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रण पाठवण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी देशभरातील अनेक राजकीय नेत्यांनाही बोलवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर राम मंदिर सोहळ्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे प्रमुख आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना निमंत्रण पाठवले आहे का, असा प्रश्न आज पत्रकारांकडून खासदार संजय राऊत यांना विचारण्यात आला. मात्र उद्धव ठाकरे यांना निमंत्रण मिळाले नसल्याचे सांगत संजय



राऊत यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला.

उद्धव ठाकरे आणि शिवसेनेला या सोहळ्याचं निमंत्रण नाही. या लोकांनी बाळासाहेब ठाकरे यांनाही निमंत्रण दिले नसते. कारण राम मंदिर उद्घाटन सोहळा हा श्रेय घेण्याचा एक भाग बनला आहे. अयोध्येत राम मंदिर उभारणीत शिवसेनेचे योगदान फार मोठे आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचं योगदान खूप मोठं आहे. थंड बासनात पडलेला प्रश्न उद्धव ठाकरे हे अयोध्येला गेल्यामुळे पुन्हा समोर आला. मात्र ते लोक आम्हाला बोलावणार नाहीत. कारण उद्धव ठाकरे अयोध्येला गेल्यामुळे शिवसेनेचा जयजयकार होईल, बाळासाहेबांचा जयजयकार होईल, असा टोला संजय राऊत यांनी लगावला. तसेच ज्यांचे खरेच योगदान आहे, त्यांना ते कधीच बोलावणार नाहीत. मात्र प्रभू श्रीराम हे सगळ्यांचेच आहेत. ते एका पक्षाचे किंवा एका नेत्याची जहागीर नाही. त्यांचा राजकीय सोहळा होऊन जाऊद्या, नंतर आम्ही जाऊन धार्मिक उत्सव करू, असेही राऊत यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय ......

### लग्नसोहळ्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेला फायदा

भारतात लग्नसोहळ्यात होणाऱ्या प्रचंड खर्चातून देशभरात बाजाराला चालना मिळत आहे. परिणामी, देशाची अर्थव्यवस्था सशक्त होताना दिसून येते. आपल्याकडे पार पडणाऱ्या सालंकृत विवाह सोहळ्यांवर अनेक घटक अवलंबून असतात. वाढपी, मंडपवाल्यापासून बँडबाजा, हनिमून पॅकेज देणाऱ्या ट्रॅव्हल्स कंपन्या, विवाहाच्या माध्यमातून या सर्व क्षेत्रांत पैसा फिरतो. या मंगल कार्यासाठी मोठा खर्च केला जातो त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला एकप्रकारे बळ मिळताना दिसून येते.

'कन्फडेरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सनुसार देशात गेल्या नोव्हेंबरपासून पुढील चार महिन्यांत देशभरात सुमारे ३८ लाखांहून अधिक विवाह सोहळ्यांचे आयोजन होणार आहे. या चार महिन्यांत सुमारे ४.७५ लाख कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता आहे. त्याचवेळी गेल्यावर्षी याच कालावधीत ३५ लाखांपेक्षा अधिक विवाहांवर ३.७५ लाख कोटी रुपयांची रक्कम खर्च झाली होती. विवाहाच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांवर होणाऱ्या खर्चाचे आकलन केल्यास यावर्षी नवीन कपडे, नवे दागिने खरेदी करण्याच्या आधारावर एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च होण्याची शक्यता आहे. याशिवाय पाहुण्यांवर होणाऱ्या खर्चापोटी ६० हजार कोटीपेक्षा अधिक खर्च होत आहे. तसेच विवाह सोहळ्याशी संबंधित कार्यक्रमांवरही एवढाच खर्च होत आहे. जगातील कोणताही देश विवाह सोहळ्यावर एवढा खर्च करत नाही. आज तर विवाह न करता लिव्ह इन रिलेशन' नावाची पद्धत रूढ झाली आहे.

विकसित देशांत प्रचलित असलेला हा पायंडा आपल्यकडेही पडत असून काही जण मुलेही जन्माला घालत नसताना दिसून येता आहे. काही काळातच त्यांचा घटस्फोट झाल्याचे समजते. यादरम्यान एखाद्या जोडप्याला बाळ झाले तर सिंगल पेरेंटच्या पद्धतीच्या अधिकाराचा वापर केला जातो. यानुसार बाळाला आईकडे राहण्याचा अधिकार असतो. पाच कारणांमुळे जगातील अनेक देशांत ज्येष्ठांची संख्या वाढत आहे आणि त्याचा थेट प्रभाव देशाच्या अर्थव्यवस्थेवर पडत आहे. एकुणातच विवाह हा वैदिक संस्कृतीचा संस्कार असून, ते भारतात कुटुंब व्यवस्था टिकवून ठेवण्यास मदत करत आहेत; अन्यथा विकसित देशांत संयुक्त कुटुंब पद्धत ती असून नसल्यासारखीच आहे. शेवटी ज्येष्ठांचा सांभाळ या देशांत सरकारच्या एका सामाजिक लाभ योजनेनुसार करावा लागतो त्यावरचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे आणि या देशांच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडत आहे. याउलट भारतात विविध सण, विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रम उत्साहाने साजरे केले जातात. या आधारावर यंदाच्या दिवाळीला आणि धनत्रयोदशीला ३.७५ लाख कोटीची उलाढाल झाली. केवळ करवा चौधच्या दिवशी १५ हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे.

# 'शासन आपल्या दारी' उपक्रमाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

## प्रशासकीय विभागांनी समन्वयाने उपक्रम यशस्वी करा- जिल्हाधिकारी कटियार



**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** शासकीय योजनाची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी 'शासन आपल्या दारी' अभियान शासनामार्फत राबविण्यात येत आहे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहचून त्यांना सहाय्य व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या अनुषंगाने शासन आपल्या दारी या कार्यक्रमाचे जिल्हास्तरीय आयोजन अमरावती येथे लवकरच करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने प्रशासकीय विभागांनी समन्वय साधून जिल्हास्तरावरील 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय 'शासन आपल्या दारी' उपक्रमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी श्री. कटियार बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी अविष्यांत पंडा, पोलीस अधीक्षक विशाल सिंगुरी, अतिरिक्त जिल्हाधिकारी सूरज वाघमारे, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी रिचर्ड यानथन, सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पी.एम. मिनू, उपजिल्हाधिकारी रणजीत भोसले, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, प्रदीप पवार, मनोज लोणारकर, रविंद्र जोंगी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत म्हस्के तसेच विविध विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार म्हणाले, शासन आपल्या दारी उपक्रम यशस्वी करण्यासाठी विविध विभागांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांनी ती चोखपणे सांभाळावी. उपक्रमामध्ये लाभार्थ्यांना कार्यक्रमासाठी आणणे हा महत्त्वाचा भाग आहे. त्याअनुषंगाने वाहतूक आराखडा तयार करावा. लाभार्थ्यांना कार्यक्रमाच्या दिवशी आणतांना त्यांची काळजी घेण्यात यावी. बसमध्ये प्राथमिक उपचारासोबतच आरोग्य सेवक, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात यावी. कार्यक्रमासाठी येणाऱ्या लाभार्थ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. कार्यक्रमस्थळी स्वच्छता विषयक व्यवस्था, शौचालय सुविधा, वीज, सुरक्षा व्यवस्था, आरोग्य, खाद्यान्ने तसेच पाणी, आसन व्यवस्था याबाबत नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमस्थळी मोठ्या प्रमाणावर नागरिक येणार असल्याने आरोग्य व्यवस्था उभारण्यात यावी. फिरत्या शौचालयांची व्यवस्था करण्यात यावी. तसेच परिसरात स्वच्छता राहील या दृष्टीने नियोजन करण्यात यावे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी बॅरेकेट्सची व्यवस्था तसेच आगीच्या स्थितीबाबत योग्य ती काळजी घेण्यात यावी. कार्यक्रमाच्या दिवशी शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक विभागाने आपल्या स्तरावर नियोजन करावे, असे आवाहन श्री. कटियार यांनी केले.

# विजेच्या लपंडावामुळे रब्बी पिके सुकू लागली

## शेतकऱ्यावर सुलतानी संकट

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक धारणी** – पूर्वीपासूनच सरकार सुद्धा शेतकर्यांच्या विरोधी निर्णय घेताना दिसते, तर दुसरीकडे निसर्ग सुद्धा शेतकर्यांना साथ देत नाही व पिकांना योग्य मोबदला मिळत नाही. त्यामुळे शेतकरी वेळोवेळी आर्थिक अडचणीत सापडतो. कर्ज काढून तसेच उधारी करून शेताची पेरणी करतो, बी बियाणे टाकतो, परंतु निसर्गाचा लहरीपणा तसेच शासनाचा बेदबाबदारपणा यामुळे शेतकर्यांना मोठा अडचणीचा सामना करावा लागत आहे. ठरलळ लीीि यासह मागील काही दिवसापासून चुरणी परिसरात विजेच्या लपंडावामुळे या परिसरातील रब्बीची पिके सुकू लागली असून याकडे विद्युत वितरण कंपनीच्या अधिकार्यांचे मुळीच लक्ष दिसून येत नसल्यामुळे या शेतकर्यांच्या तोंडाशी आलेला घास पळून जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

चुरणी परिसरात विद्युत वितरण कंपनीच्या बेजबाबदारीमुळे गव्हाचे पीक जाण्याच्या मार्गावर आहे. चुरणी परिसरात कमी दाबाचा विद्युत पुरवठा होत असल्याने शेतकर्यांचा गहू सुकण्याचा मार्गावर आहे. नेहमीच काहीना काही तांत्रिक बिघाड होत असल्याने कमी दाबाचा विद्युत पुरवठा होत आहे. त्यामुळे शेतकर्यांमध्ये रोष निर्माण झाला आहे. विद्युत वितरण कंपनीच्या जारिदा उपकेंद्रातील कर्मचार्यांच्या बेजबाबदारपणामुळे शेतकर्यांचा गहू सुकण्याचा मार्गावर आला आहे. वरिष्ठ अधिकार्यांनी ही बाब गंभीरतेने घ्यावी व या परिसरातील शेतकर्यांना विद्युत पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी होत आहे.

### वीज उपकेंद्रातच बिघाड

वीज उपकेंद्रात बिघाड झाल्यामुळे सध्या वीजपुरवठा बंद आहे, तसेच विद्युतदाब मोठ्या प्रमाणात या भागात आहे. या भागात आलेली वीज ही भैसदेहीवरून आलेली आहे, त्यामुळे जास्त दूरवरून आल्यामुळे आणि त्यातच या भागात शेतकरी सुद्धा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे व्यवस्थापन करणे कठीण जात आहे. त्यामुळे बर्याचदा तांत्रिक बिघाड होतो. त्या कारणाने या भागात वीज पुरवठा बर्याचदा खंडित होतो व कमी दाबाचा सुद्धा होतो, अशी प्रतिक्रिया महावितरणचे अचलपूरचे उप कार्यकारी अभियंता तुषार गाजरे यांनी बोलताना दिली.






# कोरफड रस आरोग्य फायदे

दि.२१विदर्भ प्रजासत्ताक कोरफडीचा रस हे कोरफडीच्या वनस्पतीच्या जेलपासून बनवलेले लोकप्रिय आरोग्य पेय आहे. कोरफडीचा रस पिण्याचे पाच संभाव्य आरोग्य फायदे या लेखात दिले आहेत.

कोरफडीचा गर फायदेशीर आहे हे सर्वांनाच माहीत आहे. याचे जेल आपल्या त्वचेसाठी आणि केसांसाठी खूप फायदेशीर आहे, तुम्ही आतापर्यंत याबद्दल अनेकदा वाचले आणि ऐकले असेल. पण तुम्हाला माहित आहे का की एलोवेरा जेलपासून बनवलेल्या ज्यूसचेही वेगळे महत्त्व आहे. होय, कोरफड चे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. अशाच काही आरोग्य फायद्यांची चर्चा आपण या लेखात करणार आहोत.

### कोरफडीच्या रसाचे फायदे :

पोषक तत्वांनी समृद्ध : कोरफडीच्या रसामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि इतर पोषक घटक असतात जे चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक असतात. यामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम यांचा समावेश होतो.

**पाचक आरोग्य :** कोरफड व्हेराचा रस जळजळ कमी करून आणि पचनसंस्थेला आराम देऊन पाचक आरोग्याला चालना देण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. हे ॲसिड रिफ्लक्स आणि इतर पाचन विकारांच्या लक्षणांपासून मुक्त होण्यास देखील उपयुक्त ठरू शकते.

**हायड्रेशन :** कोरफडीच्या रसामध्ये भरपूर पाणी असते आणि ते शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. तुम्हाला माहीत असेलच की, निरोगी त्वचा, पचन आणि एकूणच आरोग्यासाठी हायड्रेटेड राहणे खूप महत्वाचे आहे. अशा परिस्थितीत हायड्रेटेड राहण्यासाठी कोरफडीचा रस हा एक चांगला पर्याय असू शकतो.

**त्वचेचे आरोग्य :** कोरफडीचा रस त्वचेचे आरोग्य आणि देखावा सुधारण्यास मदत करू



शकतो. हे त्वचेच्या जळजळांना शांत करू शकते, जखमा आणि बर्न्सच्या उपचारांना प्रोत्साहन देऊ शकते आणि सुरकुत्या टाळण्यास देखील मदत करू शकते.

रोगप्रतिकारक समर्थन : कोरफडमध्ये अँटिऑक्सिडेंट असतात जे रोगप्रतिकारक शक्तीला समर्थन देतात आणि हानिकारक जीवाणू आणि विषाणूंपासून लढण्यास मदत करतात.

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की कोरफड व्हेराच्या रसाचे संभाव्य आरोग्य फायदे असू शकतात, परंतु ते उपचार नाही आणि वैद्यकीय उपचारांसाठी पर्याय म्हणून वापरले जाऊ नये. आपल्या आहारात किंवा आरोग्य दिनचर्यामध्ये कोणतेही महत्त्वपूर्ण बदल करण्यापूर्वी आपल्या आरोग्य सेवा तज्ञाचा सल्ला घ्या.

# महिला महाविद्यालयाचे सुयश

## दोन विद्यार्थिनींनी विद्यापीठाच्या परीक्षेत मारली बाजी





**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालयाच्या संगीत विभागातील एम. ए. च्या विद्यार्थिनींनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षेत प्राविण्य प्राप्त केले आहे . कु.अनुराधा पांडे व कु. चैताली जांभुळकर या दोन विद्यार्थिनींनी सत्र २०२२-२३ च्या अमरावती विद्यापीठाच्या परीक्षेमध्ये अनुक्रमे प्रथम व तृतीय क्रमांकाचे प्राविण्य प्राप्त केले आहे . संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या दोन्ही विद्यार्थ्यांचे कौतुक केले व ही बाब महाविद्यालय व संगीत विभागाचा गौरव वाढविणारी आहे असे मत संस्थेच्या माननीय अध्यक्ष डॉ. माया शिराळकर, संस्थेचे सचिव माननीय श्री. निनाद सोमण, संस्थेचे ज्येष्ठ उपाध्यक्ष डॉ. सुभाष कसबेकर, उपाध्यक्ष तालमणी पंडित किशोर नवसाळकर आणि संपूर्ण कार्यकारिणीनी व्यक्त केले . महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील यांनी देखील प्राविण्य प्राप्त विद्यार्थिनींचे कौतुक केले तसेच महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा गोवला गेल्याचे मत व्यक्त केले .महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापक वृंदांनी देखील प्राविण्य प्राप्त विद्यार्थिनींचे व संगीत विभागाचे अभिनंदन केले

# विशेष रेल्वे गाड्यांच्या फेऱ्या ३१ मार्चपर्यंत धावणार

## सर्व रेल्वे गाड्यांचा बडनेरा स्टेशनला थांबा



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** घेणेसण, उत्सवाच्या काळात होणारी गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वे प्रशासनाने काही विशेष रेल्वे गाड्या सुरू केल्या होत्या. मात्र, या विशेष गाड्यांचा कालावधी संपत असला तरी प्रवाशांची मागणी आणि गर्दी लक्षात घेता या गाड्या ३१ मार्च २०२४ पर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात चार विशेष गाड्या या बडनेरा रेल्वेस्थानकाहून धावणार आहेत,

पुणे-अमरावती द्वि-साप्ताहिक विशेष ट्रेन क्रमांक ०१४३९ ही विशेष रेल्वे ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अधिसूचित असणारी पुढे ती ५ जानेवारी ते ३१ मार्च २०२४ एकूण २६फेऱ्या पर्यंत वाढवण्यात येत आहे. गाडी क्रमांक ०१४४० अमरावती-पुणे विशेष ही गाडी १ जानेवारी २०२४ पर्यंत अधिसूचित असणारी आता ही गाडी ६ जानेवारी ते १ एप्रिल २०२४ पर्यंत एकूण २६ फेऱ्या वाढवण्यात येत आहे. बडनेरा-नाशिक दैनिक विशेष ट्रेन क्रमांक ०१२११ ही गाडी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अधिसूचित असणारी १ जानेवारी ते ३१ एप्रिल २०२४ पर्यंत एकूण ९१ फेऱ्या धावण्यासाठी पुढे वाढविण्यात येत आहे.

ट्रेन क्र. ०१२१२ नाशिक-बडनेरा विशेष ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अधिसूचित असणारी गाडी १ जानेवारी ते ३१ एप्रिल २०२४ एकूण ९१ फेऱ्यांपर्यंत वाढविण्यात येत आहेत.सीएसटी-नागपूर द्वि-साप्ताहिक विशेष ट्रेन क्रमांक ०२१३९ ही २८ डिसेंबर २०२३ पर्यंत अधिसूचित असणारी आता १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत एकूण १४ फेऱ्या वाढवण्यात येत आहेत.

ट्रेन क्रमांक ०२१४० नागपूर-सीएसटी विशेष गाडी ३० डिसेंबर २०२३ पर्यंत अधिसूचित असणारी आता २ जानेवारी ते १७ फेब्रुवारी २०२४ पर्यंत एकूण १४ फेऱ्या वाढविण्यात येत आहेत.पुणे-नागपूर साप्ताहिक विशेष ट्रेन क्र. ०२१४४ ही विशेष गाडी २८ डिसेंबर २०२३ पर्यंत अधिसूचित असणारी आता ४ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२३ पर्यंत एकूण ७ फेऱ्या धावण्यासाठी वाढविण्यात येत आहेत.

ट्रेन क्रमांक ०२१४३ पुणे-नागपूर साप्ताहिक विशेष १७ नोव्हेंबर २०२३ पर्यंत अधिसूचित असणारी आता ५ जानेवारी ते १६ फेब्रुवारी २०२४ अशा एकूण ७ फेऱ्यांपर्यंत वाढविण्यात येत आहे.

# संरक्षित क्षेत्रात भेट देणाऱ्या जिल्हा व उच्च न्यायालयाचे न्यायाधीशांना शुल्क भरण्यापासून सूट

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** अत्यंत चाकोरीत आणि नियोजनबद्ध आयुष्य जगणाऱ्या न्यायाधीशांना वने आणि वन्यजीवांचे कमालीचे आर्कषण असते. सार्वजनिक ठिकाणी ते जाणे टाळतात. न्यायाधीश जेव्हा-जेंव्हा वेळ मिळतो, तेव्हा तेव्हा ते जंगलाची वाट धरतात आणि वाघांचे दर्शन होईल, या आशेने भटकंती करतात. मात्र न्यायाधीशांची चिंता वन्यजीव विभागाने आता कायमची मिटवली आहे. आता न्यायाधीशांना राज्यातील व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्यात दारे उघड केली आहेत.



हल्ली ताडोबा-अंधारी, टिपेश्वर, पेंच, उमरेड-कऱ्हांडला येथे वाघांचे दर्शन होत असल्याने देश-विदेशातील पर्यटक याच व्याघ्र प्रकल्पाच्या दिशेने कूच करतात. त्यामुळे पर्यटकांच्या दृष्टीने हे प्रकल्प अत्यंत खास बनले आहेत. व्याघ्र प्रकल्पात भेटी देण्यासाठी येणाऱ्या न्यायाधीशांना वाघांचे सहजतेने दर्शन होण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता यांनी १९ डिसेंबर २०२३ रोजी आदेश काढत महाराष्ट्र वन्यजीव (संरक्षण) नियम २०१४ नियम १८(७) अंतर्गत संरक्षित क्षेत्रात भेट देणाऱ्या जिल्हा व उच्च न्यायालयाचे न्यायाधीशांना शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.

> व्याघ्र प्रकल्प अथवा अभयारण्यात शासन-प्रशासन विविध उपाययोजना करतात. मात्र न्यायमूर्तींना व्याघ्र प्रकल्पात भेटी हा निर्णय स्तुत्य आहे. त्यामुळे येत्या काळात न्यायाधीशांच्या दृष्टिकोनातून मिळणाऱ्या अभिप्रायातून व्याघ्र प्रकल्पात काही बदल देखील करता येतील.
>
> **- सुधीर मुनगंटीवार, वने व सांस्कृतिक कार्य मंत्री**

### राज्यात व्याघ्र प्रकल्पांची संख्या

न्यायाधीशांनी संरक्षित क्षेत्रात भेटी देण्याच्या शुल्कामधून सूट देताना न्यायाधीश वाघांचे दर्शन करण्यासाठी आता मेळघाट व्याघ्र प्रकल्प (अमरावती), ताडोबा-अंधारी (चंद्रपूर), पेंच (नागपूर), सह्यांद्री (कोल्हापूर), संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (बोरीवली), नवेगाव- नागझिरा (गोंदिया) या प्रमुख व्याघ्र प्रकल्पात भेटी देऊ शकतात. पत्रात उमरेड-कऱ्हांडला, टिपेश्वर, बोर (वर्धा) या अभयारण्याचा उल्लेख नसला तरी या ठिकाणीसुद्धा न्यायाधीशांना जाता येणार आहे.

# 'गणतंत्रातील पुढाकार' कार्यक्रमाचे आयोजन

## २६ जानेवारीपर्यंत तयार करणार विभागाच्या विकासाचा आराखडा



### सुशिला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्युटचा उपक्रम

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** महाराष्ट्र व भारत सरकारच्या विविध धोरणांचा उपयोग अमरावती विभाग व संपूर्ण विदर्भाच्या क्रमबद्ध विकासासाठी करण्यासाठी सुशिला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिटच्युट ऑफ टेक्नॉलॉजी अडव्हांसमेन्टद्वारे गणतंत्रातील पुढाकार या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावती शहर-जिल्हा व विभागासाठी उत्तम अशा विकासाला पूरक धोरणांची नेमकी माहिती, त्यातील आपल्या विभागाला व विदर्भाला पूरक असलेले विकास धोरण याची नीट निवड करून पुढील काळात मोठ्या प्रमाणावर अशा योजनांची माहिती गाव पातळीपर्यंत नेण्यासाठी सुशीला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅडव्हान्समेंट या व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयाने हा पुढाकार घेतला असल्याचे प्रा. दिनेश सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ सबका विकास या कृती घोषणेला अनुसरून विकासाचे विकेंद्रीकरण व समतोल विकास या आधारावर सर्वच सामाजिक औद्योगिक भौगोलिक घटकांचा योग्य दिशेने योग्य वेळेत योग्य प्रमाणात विकास साधण्याचा प्रयत्नांचा भाग म्हणून अनेक योजना अमलात आणण्यासाठी विविध धोरणांची अभ्यासपूर्ण मांडणी करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या धोरणांना पूरक अशी अनेक धोरणे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारानेमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहभागाने महाराष्ट्र सरकारने पण आखली आहेत. ही धोरणे कोणती या धोरणांचा तपशील कसा आहे तसेच या धोरणांचा उपयोग करून विदर्भातील अगदी तालुका पातळीवर सुद्धा स्थानिक संस्था, औद्योगिक समूह, व्यापारी घटक, शैक्षणिक संस्था, शेतकरी व युवा यांच्या पुढाकाराने मोठ्या प्रमाणावर उद्योग समूह रोजगार निर्मितीचे केंद्र उभे राहू शकतात अशी उत्तम क्षमता असलेली ही धोरणे आहेत. या धोरणांचा अभ्यास करून आपल्या विदर्भातील प्रत्येक जिल्ह्याला व त्यातील तालुक्याला त्याच्या स्वभावानुसार, क्षमतेनुसार विविध उद्योग रोजगार निर्मितीची केंद्र स्थापित करण्यासाठी मार्गदर्शन करणारे केंद्र सुशीला सूर्यवंशी मॅनेजमेंट ऑफ टेक्नॉलॉजी अॅडव्हान्समेंट या व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात स्थापित करण्यात आले आहे. आगामी काळात मोठ्या प्रमाणावर संवादाची प्रक्रिया आरंभ करून येत्या २६ जानेवारी २०२४ पर्यंत अमरावती विभागातील पाचही जिल्हे व यात समाविष्ट असलेल्या

औद्योगिक व्यापार संघटना, शैक्षणिक केंद्रे, युवक व सामाजिक संस्था, महिला विकासामध्ये संलग्नित संघटना यांच्याशी संपर्क करून प्राथमिक मूलभूत आराखडा तयार करण्याची प्रक्रिया गतिमान करण्यात येत आहे, असे शिवाई एज्युकेशनल सोशल अॅण्ड मेडिकल ट्रस्टचे सचिव प्रा. दिनेश सूर्यवंशी यांनी गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी पल्लवी मांडवगडे, डॉ. करमरकर, प्रविण ठोंबर, अक्षय उंबरकर, संयुक्त घाटेकर उपस्थित होते.

# जिल्हा परिषद श्रेणी ३ पदावर प्रमोशनसाठी पूर्व परीक्षा १ जानेवारीला

## विभागीय आयुक्तांनी मागविला रिक्त जागांचा अहवाल

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** जिल्हा परिषदेतील वरिष्ठ सहाय्यकांची २५ टक्के रिक्त पदे जिल्हा परिषदेत कार्यरत कनिष्ठ सहायक, भांडार सहायक, संगणक चालकांमधून भरण्याचे नियोजन विभागीय आयुक्तलयातर्फे जाहीर करण्यात आले असून जि.प. तील श्रेणी ३ पदावर प्रमोशनसाठी १ जानेवारीला मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा २०२३ अंतर्गत जि.प. कर्मचाऱ्यांची पूर्व परीक्षा घेतल्या जाणार आहे. यासाठी विभागीय आयुक्तांनी जि.प. कडून रिक्त वरिष्ठ सहायक पदांची माहिती मागवली आहे. तसे पत्र गुरुवारी जिल्हा परिषदेला प्राप्त झाले.अमरावती जिल्हा परिषदेला मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा २०२३ अंतर्गत जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहायक, भांडार सहायक, कॉम्प्युटर ऑपरेटर या पदावरील कर्मचाऱ्यांमधून वरिष्ठ सहायक पदावर २५% कर्मचाऱ्यांची निवड करायची आहे. सदर परिक्षेची पूर्व तयारी करण्याच्या दृष्टीने येत्या ०१ जानेवारी, २०२३ रोजी आयोजीत पूर्व परीक्षेला ज्यांना सात वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे व सेवाप्रवेश परिक्षा उत्तीर्ण झाले आहेत असे कर्मचारी या परिक्षेस बसण्यास पात्र आहेत. अशा कर्मचाऱ्यांसाठी किती पदे उपलब्ध आहेत. याबाबत रिक्त पदांची प्रवर्गनिहाय माहिती व मंजुर बिंदू नामावली दि.३१.१२.२०२२ ची स्थिती) विभागीय आयुक्तालयाकडून मागविण्यात आली आहे. विभागीय आयुक्तालयाला जिल्हा परिषदे कडून रिक्त पदांची माहिती प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठ सहायकांची २५% पदे निवडीने भरण्यासाठी मर्यादित स्पर्धात्मक परीक्षा २०२३ करिता पदे जाहिर करण्यात येतील. तसेच त्या परीक्षेबाबतचा समबध्द कार्यक्रम ठरविल्या जाणार आहे. सर्व जिल्हा परिषदांना पत्र गुरुवारी पाठवण्यात आले आहे.

# अमरावतीत आय टी पार्क करा

## कृती समितीचे उमुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** पश्चिम विदर्भाचे मुख्यालय असलेल्या अमरावती येथे लवकरच आयटी पार्क स्थापन करण्यात येणार आहे. याकरिता भाजपाचे किरण पातुरकर यांच्या नेतृत्वात आयटी पार्क कृती समितीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले आहे.पश्चिम विदर्भाचे मुख्यालय अमरावती येथे आयटी पार्क स्थापन करावा या मागणीला घेवून किरण पातुरकर यांच्या नेतृत्वात आयटी पार्क अमरावती या नावाने कृती समितीची स्थापना करण्यात आली आहे. आयटी



क्षेत्राशी संबधित विषिध शिक्षक तज्ञ, उद्योजक आणि व्यापारी यांची बैठक तसेच विद्यार्थ्यांची बैठक झाली आहे.

या बैठकीमध्ये ठरल्यानुसार १८ डिसेंबरला कृती समिती संयोजक किरण पातुरकर यांच्या नेतृत्वाखाली माजी महापौर किरण महल्ले, प्रा. रवींद्र खांडेकर, आयटी उद्योजक दीपक पोहनकर, सामाजिक कार्यकर्ते गजानन देशमुख, प्रवीण वैश्य, ऋषिकेश देशमुख यांनी विधानभवनात विविध मंत्री आणि आमदार यांच्या भेटी घेऊन अमरावतीला आयटी पार्क का आवश्यक आहे हे सागितले, तसेच याचाबतचे निवेदन उपमुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस यांनादेखील दिले. त्यांनी वा मागणीबाबत सकारात्मकता दर्शविली.त्यामुळे कृती समिती लवकरच

आयटी क्षेत्रातील संबधित सर्व प्राध्यापकांची एक बैठक तसेच ज्यांची मुल बाहेरगावी आयटी क्षेत्रामध्ये नोकरीला आहे. अशा पालकांची आणि या मागणीला सक्रीय समर्थन देणाण्यांची दुसरी बैठक, आयटी क्षेत्रांशी संबधित विद्यार्थ्यांची तिसरी बैठक होणार आहे.

# उपराष्ट्रपतींच्या अवमानाचा कडाडून निषेध

## इर्विन चौकात भाजपाची निदर्शने



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - लोकशाहीचे मंदिर संसद भवनात तृणमूल कॉंग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याबाबत अवमानास्पद वक्तव्य करून व्यंगात्मक नकल केली. त्याचे चित्रण राहूल गांधी यांनी केले. दोघांच्याही कृतीचा अमरावती शहर भाजपातर्फे गुरूवारी इर्विन चौकात निषेध करण्यात आला.

भाजपाचे अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष आ. प्रवीण पोटे यांच्या मार्गदर्शनात व महिला मोर्चा अध्यक्षा गंगा खारकर यांच्या नेतृत्वात तसेच युवा मोर्चा अध्यक्ष कौशिक अग्रवाल यांच्या पुढाकाराने भाजपाच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. लोकशाहीचे मंदिर संसद भवनात तृणमूल कॉंग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याबाबत अभद्र वक्तव्य करून त्यांच्या व्यंगत्वावर टीका केली. विशेष म्हणजे, कॉंग्रेसचे खा. राहुल गांधी हे त्याचे चित्रण करीत होते. याबद्दल अमरावती शहर जिल्हा भाजपातर्फे गुरूवारी तीव्र निषेध करण्यात आला. या निषेधाच्या वेळी भाजपा अमरावती शहर सरचिटणीस विवेक कलोती, सतीश करेसिया, अनिता राज, लखन राज, महिला मोर्चा सरचिटणीस छायाअंबाडकर, लविना हर्षे, शीतल वाघमारे, माजी उपमहापौर संध्या टिकले, कुसूम साहू, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष लता देशमुख, प्रदेश कार्यकारिणी सदस्य, रश्मी नावंदर, महाराष्ट्र प्रदेश युवा मोर्चा सचिव हरीश साऊरकर, प्रवीण रूद्रकार, उपाध्यक्ष सुधीर बोपुलकर, किसान मोर्चा अध्यक्ष मिलिंद बांबल, मंडळ अध्यक्ष मनीष चौबे, श्रीकांत धानोरकर, राजेश साहू ,राजू कुरील, उपाध्यक्ष रिता मोकलकर आदींची उपस्थिती होती.

## उद्याला महिला महाविद्यालयात जिल्हास्तरीय गीत गायन स्पर्धेचे आयोजन

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय आंतर कनिष्ठ महाविद्यालय कराओके सुगम गीत गायन स्पर्धेचे आयोजन उद्या शनिवार दिनांक २३ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले आहे या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता https://forms.gle/TQ5xiuc8MPNhHIGC- या रजिस्ट्रेशन लिंक वर जाऊन आपली नोंदणी करू शकता. स्पर्धेचे स्थळ - नवीन प्रेक्षागृह- महिला महाविद्यालय ,अमरावती वेळ - सकाळी ९ वाजता अधिक माहिती करिता खाली दिलेल्या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा. डॉ. जयश्री वैष्णव- ९४२२१५६७८९डॉ. शर्मिला देशमुख- ७९७२०८२९८४

# मोर्शी येथून ट्रॅक्टर ट्रॉलीसह अवैध सागवान जप्त

## वन विभागाची कारवाई, शेणखताचे दिले होते आवरण

**दि२१विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी-** ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये सागवान लाकूड टाकून त्यावर शेणाचे आवरण घालून सागवान लाकडाची तस्करी होत असल्याची माहिती वनविभागाला प्राप्त झाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून सागवान लाकडासह ट्रॅक्टर ट्रॉली असा एकूण ३ लाख ५ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. मोर्शी ते पाळा मार्गावर २० डिसेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली. वाहतुक करतांना भुपेश बकाराम भलावी रा. अमराई मध्यप्रदेश याच्या ताब्यातून ट्रॅक्टर व ट्रॉली जप्त करण्यात आली. वाहनचालक भुपेश बकाराम भलावी यांनी दिलेल्या माहितीवरुन शेख हमिद शेख महम्मंद रा. फ़रीद कॉलनी, मोर्शी याच्या फर्निचर दुकानातून एक लाकुड कापण्याची मशिन जप्त करण्यात आली. चालक भुपेश बकाराम भलावी याची कसून चौकशी केल्यानंतर नसिम अहेमद अब्दुल हसन रा. फरीद कॉलनी, मोर्शी याच्या घराची झडती घेण्यात आली व कापण्याची मशिन जप्त करण्यात आली. चालक भुपेश बकाराम भलावी याची कसून चौकशी केल्यानंतर नसिम अहेमद अब्दुल हसन रा. फरीद कॉलनी, मोर्शी याच्या घराची झडती घेण्यात आली व विनापरवाना चालविण्यात येणाऱ्या एक लाकुड कापण्याची मशिन जप्त करण्यात आली. तसेच नसिम अहेमद अब्दुल हसन याच्या मोर्शी येथील शेतातील घरामधून सागवान चरपट नग-३१, घ.मी. १.५४१ किंमत रु.१ लाख ४२ हजार ४६८ तसेच जप्त ट्रॅक्टर व ट्रॉलीची किंमत ४ लाख जप्त करण्यात आली.सदर या कारवाईत जप्त करण्यात आलेले अवैध सागवान पचमोह या गावातून आणण्यात आलेले आल्याचे तपासात निष्पन्न झाले, पुढील तपास मोर्शी वनपरिक्षेत्र व आठनेर वनपरिक्षेत्र मध्यप्रदेश यांचेकडुन संयुक्तपणे केला जात आहे.सदर कारवाई उप वन संरक्षक अमित मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली, सुहास एम. चव्हाण, परिविक्षाधीन भा.व. से. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) मोर्शी यांच्या नेतृत्वात अमोल चौधरी, वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रा) मोर्शी यांचे सहकार्याने, एल.एस. दाढे, वनपाल, मोर्शी वर्तुळ अधिकारी बी.जी. पंधराम, पी.पी. गणविर, पी.एस. रहाटे, एन. आर. गोरे, एन.एस. लंगडे, एच.एस. देशमुख, आर.डी. आसोले, एस.बी. नागापुरे, एम.ए. सोळंके, वनरक्षक तसेच डी.एन. दिघेकर, वनमजुर इ. वनकर्मचारी यांनी केली.

# नाफेडकडून तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी सुरू

## चित्रा चौक येथील खरेदी-विक्री समिती कार्यालयात सुविधा

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** नाफेडकडून तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी सुरु करण्यात आली आहे. विदर्भ को ऑप मार्केटिंग फेडरेशन नागपूरच्या अमरावती शाखेतर्फे अमरावती सहकारी शेतकरी खरेदी विक्री समिती कार्यालय चित्रा चौक येथे गुरुवारपासून नाफेडकडून तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी सुरु करण्यात आली. नाफेड द्वारा शेतकऱ्यांना तूर खरेदीसाठी झडक्र २०२३- २४ अंतर्गत नाफेड पोर्टलवर त्वरित नोंदणी करण्याचेआवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी आपली नोंदणी करण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी त्यांचा सन २०२३-२४ चा पिक पेऱ्यासह सातबारा, बँक पासबुक लिंक असलेले आधार कार्डाची झेरॉक्स, बँक पासबुकची स्पष्ट झेरॉक्स, कॅन्सल चेक व नोंदणी अर्ज घेऊन अमरावती सहकारी शेतकरी खरेदी विक्री समिती, चित्रा चौक, जुना कॉटन मार्केट रोड, अमरावती येथे सादर करावे व नोंदणी क्रमांक घ्यावा, असे आवाहन दिलीप रोहणकर यांनी के आहे.

# व्ही केवायसीची साईट बंद

## नोंदणीसाठी शेतकऱ्यांची होत आहे पायपीट

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक** अतिवृष्टीच्या नुकसानभरपाईसाठी आता व्ही केवायसी करणे बंधनकारक आहे. परंतु ही साईटच चालत नसल्याने शेतकरी मदतीपासून वंचित आहे. आधी शेत खरडले, पिके बाहून गेली, त्यात मदतही मिळेना म्हणून तेल गेलं तूपही गेलं आता आधी धुपाटण आल्याची भावना शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाली आहे.

गत जुलै महिन्यात तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. यात नदी- नाल्यांच्या पुराचे पाणी शेतात शिरल्याने उभ्या पिकांसह सेती खरडून गेली. त्यानंतर शासनाने पंचनाम्याचे आदेश दिले. सरकारी यंत्रणा कामी लागली. पंचनामे झाले, नुकसानीचे क्षेत्र ठरले. सरकारने नुकसानभरपाईची घोषणा केली. आज मिळेल उद्या मिळेल करोत पाच महिन्यांचा कालावधी उलटला. जेमतेम पेरणी करून एक महिन्याचा कालावधी झाला असताना अस्मानी संकटात स्वप्ने वाहून गेली. मदतीच्या घोषणेने शेतकरी सुखावला खरा, मात्र पाच महिन्यांपासून मदतांकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांचे हात रिकामेच राहिले, तालुक्यातील रोकडो हेक्टर जमीन यात बाधित झाली महसूल विभागाच्या अधिकारी, तलाठी यांच्याकडे विचारणा करून शेतकरी थकला असतानाच आता या मदतीसाठी व्ही केवायसी करणे गरजेचे असल्याचे सांगण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी सेतू केंद्र व आपले सरकार केंद्राकडे आपला मोर्चा वळविला. मात्र गेल्या पंधरा दिवसांपासून साईटच चालत नसल्याने शेतकरी पुन्हा चकरा मारून थकला. यात शेतीची कामे रेंगाळली, आर्थिक भरही आला मात्र मदत मिळालीच नाही जोपर्यंत ही व्ही केवायसी होत नाही तोपर्यंत मदत मिळणार नाही, असे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्याने व तो होत नसल्याने आता काय करायचे, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.

# पीएचडी संशोधकांच्या अर्थसहाय्य योजनेत वाढ

## महाज्योतीच्या संचालक मंडळाचा निर्णय

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूरमार्फत ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गातील पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांना विद्यावेतनातून त्यांना अर्थसहाय्याचे पाठबळ देण्याचे मोलाचे कार्य होत आहे. त्यामुळेच आज राज्यातील हजारो विद्यार्थी हे प्रगती पथावर गेले आहे. परंतु, विद्यावेतनात युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशन (युजीसी) मार्फत नवीन सुधारित दर करण्यात आलेले होते, त्याच आधारावर महाज्योतीच्या संचालक मंडळाने आज पीएचडी संशोधकांच्या अर्थसहाय्य योजनेत वाढ केलेली आहे. आता महाज्योती नवीन दराने पीएचडी संशोधकांना अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. ज्युनिअर रिसर्च फेलोशिप (जेआरएफ) मध्ये आता ३७ हजार रूपये व सीनियर रिसर्च फ़ेलोशिप (एसआरएफ) करिता ४२ हजार रूपये प्रतिमाह दराने अधिछात्रवृत्तीची रक्कम तसेच घरभाडे भत्ता ३० टक्के, २० टक्के व १० टक्के या सुधारित दराने देण्यात येणार असल्याची माहिती महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. दर्जेदार प्रशिक्षण मिळावे तसेच विद्यावेतनातून त्यांना अर्थसहाय्याचे पाठबळ देण्याचा हेतूने संस्था काम करत आहे. पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांना दरमाह फेलोशिप देण्यात येत आहे, यातून शेकडो विद्यार्थ्यांना यश प्राप्त करता आले. आता यामध्ये २ वर्ष जेआरएफकरिता ३१ हजार रूपये प्रतीमाह देण्यात येत होते. एसआरएफकरिता उर्वरित ३ वर्षांसाठी ३५ हजार प्रतिमाह अर्थसहाय्य देण्यात येत होते. तसेच घरभाडे भत्ता हा २४ टक्के, १८ टक्के व ८ टक्के या दराने देण्यात येत होता. मात्र, युजीसीमार्फत नवीन सुधारित दर करण्यात आलेले होते, त्याच आधारावर महाज्योतीने आज पीएचडी अर्थसहाय्य योजनेत वाढ केलेली आहे संचालक मंडळाच्या बैठकीत याबाबत महाज्योतीने आज सुधारित दराने अर्थसहाय्य देण्यात मान्यता प्रदान केलेली आहे. जेआरएफकरिता आता ३७ हजार रूपये व एसआरएफकरिता ४२ हजार रूपये प्रतिमाह दराने अधिछात्रवृत्तीची रक्कम तसेच घरभाडे भत्ता ३० टक्के, २० टक्के व १० टक्के या सुधारित दराने देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना आता फरकाची रक्कम देखील पुढील हप्त्याच्या वेळी अदा करण्यात येणार असल्याची माहिती महाज्योतीच राजेश खवले यांनी कळविले आहे.

# दाऊदला खरंच विष देण्यात आलं होतं?

## पाकिस्तानने सोडलं मौन; भारताविषयी ओकली गरळ

**दि. २२ विदर्भ प्रजासत्ताक कराची –** अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या विषप्रयोगाच्या वृत्तावर पाकिस्तानने प्रथमच भाष्य केले आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र कार्यालयाने एका प्रश्नाच्या उत्तरात दाऊद इब्राहिम पाकिस्तानात असल्याच्या बातम्या पूर्णपणे फेटाळून लावल्या आहेत. त्याऐवजी पाकिस्तानने भारतावरच, खोट्या बातम्या पसरवल्याचा आरोप केला आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र कार्यालयाने दावा केला की,



भारत त्यांच्या देशाविरुद्ध अपप्रचार करत आहे. १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटाचा मास्टरमाईंड दाऊद इब्राहिम त्याच्या अनेक साथीदारांसह पाकिस्तानात विश्रांती घेत असल्याच्या अनेक चर्चा रंगल्या आहेत. पाकिस्तानी गुप्तचर संस्था खडख ने त्याला आपल्या संरक्षणात ठेवले असल्याचे वृत्त काही वेळ प्रसारमाध्यमात आले होते. मात्र सध्या दाऊदच्या मुद्द्यावरून पाकिस्तान भारतावरच आरोप करताना दिसत आहे.

पाकिस्तानने दाऊदबद्दल काय म्हटले?

वरिष्ठ पाकिस्तानी पत्रकार मारियाना बाबर यांनी परराष्ट्र कार्यालयाचा हवाला देत ट्विटमध्ये लिहिले आहे की, सर्वांनी हे लक्षात ठेवावे की भारताला पाकिस्तान विरुद्ध खोट्या बातम्या आणि आरोपांचा प्रचार करण्याची सवय आहे. असे अनेक पुरावे समोर आले आहेत, ज्यामध्ये भारत नियमितपणे खोट्या बातम्या देत आहे. खोट्या बातम्या पसरवून पाकिस्तानला मुद्दाम लक्ष्य केले जात आहे. त्यामुळे आम्ही अशा खोट्या बातम्यांवर भाष्य करू इच्छित नाही, ज्यांचा पाकिस्तानला लक्ष्य करण्यासाठी प्रचार केला जातो, असे एण डिसइन्फो लॅबने म्हटले आहे.

### भारतीय सुरक्षा यंत्रणांनीही दिला नकार

भारतीय सुरक्षा यंत्रणांच्या सूत्रांनी अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमला विषबाधा झाल्याच्या आणि रुग्णालयात दाखल केल्याच्या बातम्याही खोट्या असल्याचं म्हटलं आहे. मुंबई पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने हे वृत्त खोटे असल्याचे म्हटले. अधिकारी म्हणाला की, अंडरवर्ल्ड डॉन दाऊद पाकिस्तानात इब्राहिमचा खास मुलगा शकील पाकिस्तानात त्याच्या घरी आहे, ज्यामुळे ही बातमी खोटी असल्याची कल्पना निर्माण झाली.

# राहूल गांधी व कल्याण बॅनर्जीवर संताप

## पुतळा पोलिसांच्या ताब्यात, धारणीत भाजपाची निदर्शने



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक धारणी–** काँग्रेसचे खा. राहुल गांधी आणि तृणमूल खा. कल्याण बॅनर्जी यांचे पुतळे धारणी भाजपाने चौकात जाळण्यासाठी आणले असता पोलिसांनी पुतळे ताब्यात घेतले. यानंतर माजी आ. प्रभुदास भिलावेकर यांच्या नेतृत्वात छोटेखानी सभा घेऊन खासदारांच्या लोकतंत्रविरोधी कृत्याचा निषेध करण्यात आला. भाजपा कार्यकर्त्यांना नंतर समज देण्यात आली.

धारणी शहर भाजपाचे अध्यक्ष श्याम गंगराडे यांच्या मार्गदर्शनात गुरूवारी दुपारी बस स्थानकासमोर खा. राहुल गांधी आणि खा. बॅनर्जी यांच्या पुतळ्याचे दहन व निदर्शने आयोजित करण्यात आले होते. घटनास्थळी पोलिस उपनिरीक्षक ईश्वर सोळंके उपस्थित होते. पुतळा दहन न करता निदर्शनेच करा, अशी विनंती त्यांनी श्याम गंगराडे तथा मेळघाट विधानसभा प्रमुख प्रभुदास भिलावेकर यांना केली. नंतर दोन्ही पुतळे पोलिसांनी ताब्यात घेतले.निदर्शने करणार्यांना समज देण्यात आली. आयोजनात सुधाकर पकडे, दीपक मालवीय, गोविंद खरे, रिंकू बडनखे, प्रदीप झारेकर, आतिश प्रजापती, रोहित यादव, दर्शन बरधे, हितेश उईके, अभय आकोडे, पंकज भारती, संतोष झारेकर, सुशील भिलावेकर, महेन्द्र क्षीरसागर, चंद्रशेखर खार्वे, तालुका उपाध्यक्ष सुशील गुप्ता, विक्की पुरोहित प्रामुख्याने उपस्थित होते.

# प्रोत्साहन योजनेतून ८ हजार १५६ शेतकऱ्यांची नावे बाद

## १७ हजार ८०१ शेतकऱ्यांना ८१ कोटी ११ लाखांचे वाटप

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** शासनाच्या महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर योजनेतून ८ हजार १५६ शेतकऱ्यांची नावे बाद करण्यात आली आहे. आतापर्यंत प्रत्येकी ५० हजार रुपयांप्रमाणे १७ हजार ८०१ शेतकऱ्यांना ८१ कोटी ११ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले. परंतु गत दोन ते दीड महिन्यांपासून पोर्टल बंद असल्याने पात्र असलेल्या ९०५ शेतकऱ्यांचे अनुदान अद्यापही मिळाले नाही. त्यामुळे त्यांना या अनुदानाची प्रतीक्षा लागली आहे.

महाविकास आघाडी सरकारने दोन लाखापर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली होती. त्याची अंमलबजावणी देखील सुरू झाली आहे. अशातच ज्या शेतकऱ्यांनी नियमित कर्जफेड केली अशा शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रूपये प्रोत्साहन अनुदान देण्याची देखील घोषणा केली असताना या योजनेला शिंदे सरकारच्या काळात गती आली. त्यामुळे याकरिता ३२ हजार ६३३ शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात आली होती. यातील १८ हजार ९२५ पात्र ठरवित १८ हजार १० शेतकऱ्याचे केवायसी पूर्ण करण्यात आले. यातील १७ हजार ८०१ शेतकऱ्यांना दीड वर्षात ८१ कोटी ११ लाखांचे अनुदान वाटप देखील करण्यात आले. परंतु ९०५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण झाले असताना देखील अद्यापही त्याना प्रोत्साहन अनुदानाचा लाभ मिळाला नाही. गत दीड महिन्यांपासून याबाबतचे पोर्टलच बंद असल्याने सदरची प्रक्रिया आता रखडली आहे. त्यामुळे हे पोर्टल कधी सुरू होईल आणि या शेतकऱ्यांना याचा लाभ केव्हा मिळेल, याची प्रतीक्षा लागली आहे. त्यामुळे आता लोकप्रतिनिधी याकडे लक्ष देतील का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### पोर्टल बंद असल्याने ९०५ शेतकऱ्यांचे अनुदान रखडले



# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची सुवर्ण संधी

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे राज्यातील नवयुवक, नवयुवतीसाठी दि. ८ ते १७ जानेवारी, २०२४ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ५६ आयोजित करण्यात आले आहे. या कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची नि:शुल्क व्यवस्था करण्यात आली आहे.अमरावती जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधीचा लाभ घेण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती येथे दि. ३ डिसेंबर २०२४ मुलाखतीस हजर रहावेत. मुलाखतीस येते वेळी सैनिक कल्याण विभाग, पुणे (Department of Sainik Welfare, Pune) या वेबसाईट वर सर्च करुन त्यामधील एसएसबी-५६ कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरुन सोबत घेऊन यावे.केंद्रामध्ये एसएसबी कोर्समध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र




कोर्सला येताना सोबत घेऊन यावेत. अ) कंम्बाईड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (CDSE-UPSC) अथवा नॅशनल डिफेंस अकॅडमी एक्झामिनेशन (ND--UPSC) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. ब) एनसीसी सी सर्टिफिकेट 'ए' किंवा 'बी' ग्रेडमध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी. क) टेक्निकल ग्रॅज्यूएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. ड) युनिर्व्हसिटी एन्ट्री स्कीम साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबी साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे.अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई-मेल आयडी- training.pctcnashikgmail.com व दूरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा सैनिक कल्याण अधिकारी आशिष बिजवल यांनी केले आहे.

# 'सरसकट आरक्षण शक्य नाही; जरांगे पाटलांनी २४ तारखेचा हट्ट धरू नये' - गिरीश महाजन

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अंतरवाली सराटी** १ : मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला २४ डिसेंबरची डेडलाईन दिली आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी सरकारचे शिष्टमंडळ जरांगे पाटलांच्या भेटीसाठी अंतरवाली सराटीत दाखल झाले. या शिष्टमंडळात मंत्री गिरीश महाजन, मंत्री उदय सामंत, मंत्री संदीपान भूमरे यांची उपस्थिती होती. यावेळी झालेल्या चर्चेतून कोणताही मार्ग निघालेला नाही.



यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना गिरीश महाजन म्हणाले की, 'सरसकट आरक्षण देणे शक्य नाही, जरांगे पाटलांनी २४ तारखेचा हट्ट धरू नये. विधानसभेचे सत्र कालच संपले, त्यात आरक्षणावर चार दिवस चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक चर्चा केली. मागे दिलेले आरक्षण टिकले नाही, म्हणून सर्व बाजूने विचार करुन आणि कायद्याने टीकणारे आरक्षण दिले जाईल', असं महाजन म्हणाले.

'नोंदी असलेल्या सबंधीत नातेवाईकांना आणि सर्व रक्तातील सगेसोयऱ्यांना प्रमाणपत्र मिळेल. पण, आमच्या मामाला किंवा मावशीला प्रमाणपत्र मिळावे, असे करता येणार नाही. महिलेवरुन तिच्या मुलांची जात ठरत नाही, वडिलांच्या दाखल्यावरुनच मुलांची जात ठरते. न्या. शिंदेंच्या अध्यक्षतेखाली काम सुरू आहे. शेवटच्या माणसाची नोंद बघेपर्यंत कार्यवाही चालूच राहणार. महिन्या दीड महिन्यात हा प्रश्न निकाली लागणार आहे.'

'शिंदे समिती आणि निवृत्त न्यायाधीशांनी मागच्या वेळेस जे बोलण झाले, त्यात सगेसोयरे उल्लेख केला. पण तसे होत नाही, मुलीकडे सोयरे रक्ताच्या नात्यात येत नाही. त्यावर थोडा संभ्रम निर्माण झाला आहे. पण, तो प्रश्न लवकरच सुटेल. आमच्याकडून सोयरे हा शब्द आलेला आहे, ते कायद्यात बसत नाही. सोयऱ्यात बायकोचे नातेवाईक येतात, त्यांना आरक्षण देता येत नाही. सुप्रीम कोर्ट ही हा शब्द नाकारेल.'

महाजन पुढे म्हणाले की, 'मागच्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी आरक्षण दिले होते, पण सरकार बदलल्यामुळे आरक्षण टिकू शकले नाही. विशेष अधिवेशन घेऊन मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेऊ. मराठा आरक्षण द्यायचे आहे, शासनाची भूमिका सकारात्मक आहे. आरक्षण अंतिम टप्प्यात आले आहे, आपण २४ तारखेचा अल्टिमेटम देऊ नये. क्युरेटिव्ह पिटीशन आणि मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून हा प्रश्न आपण मार्गी लावणार आहोत. अजूनही आपल्याकडे दोन अहवाल आले आहेत. जे दाखले सापडतील त्यांच्या नातेवाईकांना ते लागू होईल.'

'आम्हाला ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण द्यायचे आहे. चर्चेची दारं खुली असली तर मार्ग निघेल. सोयरा शब्दावरून जरांगे आणि आमची वेगवेगळी मतं आहे. विमल मुंदडा केसचा संदर्भ पाहता मुंदडा मुळच्या एससी होत्या, लग्नानंतर त्या मारवाडी झाल्या. त्यामुळे, ज्यांचे कुणबी दाखले आहेत ते ओबीसी आहेत. त्यांच्या रक्तातल्या नात्यातल्या लोकांना आरक्षण देणे बंधनकारक आहे', अशी माहिती महाजन यांनी दिली.

# अयोध्येतून आलेल्या अक्षत कलशाचा धामणगावनगरीत वितरण सोहळा

## १ ते १५ जानेवारी पर्यंत घरोघरी देण्यात येणार निमंत्रण

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक धामणगाव रेल्वे–** प्रभू श्रीरामचंद्र यांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा अयोध्या येथे २२ जानेवारी २०२४ ला धर्मगुरू साधू संत व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. याच अनुषंगाने अयोध्या येथून आलेल्या पूजीत अक्षत कलशाचे धामणगाव नगरीत वितरण करण्यात आले.

अयोध्या येथून श्रीराम मंदिर : ट्रस्टकडून आलेले पूजित अक्षत कलश नुकतेच धामणगाव येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जिल्हा कार्यालय सेवा स्मृती भवन येथे वितरीत करण्यात आले. आयोजित कार्यक्रमात अमरावती विभाग संघचालक शेखर भोंदू, प्रांत कार्यकारिणी सदस्य चंद्रशेखर राठी, जिल्हा संघचालक विपिन काकडे, अमरावती विभाग प्रचारक विष्णू देशमुख, विश्व हिंदू परिषद बजरंग दलाचे रुपेश राऊत, राजेश झंवर, निखिल मोहोड उपस्थित होते. १ ते १५ जानेवारीदरम्यान अक्षद निमंत्रण अभियान संपूर्ण देशभरात संघ, विहीप, बजरंग दल व अनेक संघटना मिळून करणार आहेत. गेल्या ५५० वर्षा पासूनच सुरु असलेला हा संघर्ष आणि आता प्रत्यक्ष प्रभू श्रीरामचंद्र यांचे उभे होत असलेले – मंदिर व रामलल्ला यांची होणारी भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळा याची संपूर्ण राम भक्तांना उत्कंठा लागलेली आहे. त्यामुळे अक्षता देवून घरोघरी निमंत्रण दिले जाणार आहे. यावेळी अयोध्या येथून आलेल्या पूजीत अक्षत कलश श्रीराम मंदिर येथे पूर्ण भक्तिमय वातावरणात आरती पूजन, पुष्प अर्पण करून तालुका समितीकडे वितरीत करण्यात आले. यावेळी चंद्रशेखर राठी



यांच्या हस्ते विविध तालुका समितीचे संयोजक सह संयोजकांना पूजित अक्षत कलश वितरीत करण्यात आले.

# विदर्भ क्रिकेट संघटनेद्वारा निवड चाचणी

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** विदर्भ क्रिकेट संघटना नागपूरच्या वतीने अमरावती जिल्ह्यातील प्रतिभावंत खेळाडूंचा शोध घेण्यासाठी १५ वर्षाखालील मुलीसाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात येत आहे. ही चाचणी २५ डिसेंबर रोजी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रिकेट मैदानावर घेण्यात येत आहे.

या निवड चाचणीसाठी खेळाडूंचा जन्म हा १ सप्टेंबर २००९ नंतर व ३१ ऑगस्ट २०११ च्या शेले झालेला आहे त्यांनाच या निवड चाचणी करता प्रवेश देण्यात येईल, निवड चाचणीला येताना खेळाडूंनी जन्म प्रमाणपत्र व आधार कार्ड पूर्व विवरण सोबत घेऊन येणे आवश्यक आहे. या निवड चाचणीसाठी खेळाडूंनी सकाळो ठीक ९ वाजता स्वत:च्या क्रिकेट साहित्यासह उपस्थित राहावयाचे आहे. नागपूर येथून विदर्भ क्रिकेट संघटनेचे निवड समिती सदस्य येणार आहेत. अमरावती जिल्ह्यातील खेळाडूंनी दिलेल्या तारखेवर व वेळेवर उपस्थित राहून आपली नोंदणी आल्हाद लोखडे, योगेश नवाचे व यश सूर्यवंशी यांच्याकडे करावी, जास्तीत जास्त खेळाने उपस्थित राहून या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन विदर्भ क्रिकेट संघटनेचे जिक्रिकेट समितीचे अध्यक्ष शरद पाध्ये, सुशीला निनिक ॲड प्रशात देशपांडे व जिल्ला समिती सदस्य डा दोनानाथ नवाथे यांनी केले आहे.

# काँग्रेस पक्षात निष्ठावंत कार्यकत्यांना स्थान नाही

## भाजपा प्रवेशानंतर छाया दंडाळे यांचा पत्रपरिषदेत आरोप

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक तिवसा :** गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्षात निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून मी काम केलं, महिलांचं एक मजबूत संघटन उभं केलं. परंतु स्थानिक पक्ष नेतृत्वाने याची दखल न घेता माझं खच्चीकरण करण्याचा प्रयत्न अलीकडच्या काही वर्षात केला. स्थानिक कार्यकत्यांना बळ देण्याऐवजी त्यांना प्रतिस्पर्धी मानून मानसिक व राजकीय खच्चीकरण करण्याचे काम 'तिवसा मतदारसंघात स्थानिक नेतृत्वाकडून करण्यात आले. याचमुळे मी अखेर कंटाळून काँग्रेस पक्ष सदस्याचा राजीनामा दिल्याचे कापूस पणन महासंघाच्या संचालिका छाया दंडाळे



यांनी गुरुवारी तिवसा येथे आयोजित पत्रपरिषदेत सांगितले. जिथे कार्यकर्त्यांच्या कामाची किंमत होत नसेल किंवा एखादा निष्ठावंत कार्यकर्ता समोर जात असलेले स्थानिक पक्ष नेतृत्वाला आवडत नसेल तेथे काम करून काय फायदा? असा प्रश्न उपस्थित करून जड अंतःकरणाने मी काँग्रेसमधून बाहेर पडून भाजपचे नेते राजेश वानखडे व त्यांच्या पक्ष नेतृत्वावर विश्वास ठेऊन नुकताच भारतीय जनता पक्षात माझ्या कार्यकत्यांसह प्रवेश केला आहे. काँग्रेस पक्षात सच्च्या व प्रामाणिक कार्यकर्त्यांना स्थान नसून तालुक्यातील पक्ष नेतृत्वाने नेहमीच मला डावलण्याचा प्रयत्न केला आहे.म्हणुन काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊन भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, संजय कुटे, राजेश वानखडे, यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षात प्रवेश केला असल्याचे आयोजित पत्रकार परिषदेतून छाया दंडाळे यांनी सांगितले आहे. यावेळी भाजप तिवसा विधानसभा प्रमुख राजेश वानखडे, प्रदीप गौरखेडे, अनिल थुल, आशिष ढोले, संजय वै. देशमुख, अतुल वै. देशमुख, निलेश श्रीखंडे यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव : अविश्यांत पांडा

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २०२३ समारोप समारंभ संपन्न

## भारताला महाशक्ती बनण्याकरिता विद्यार्थ्यांनी योगदान द्यावे : आमदार प्रविण पोटे पाटील

**दि२२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २०२३ करीता भारत सरकार, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल आणि ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन द्वारा निवड झाली यात अकरा विविध राज्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धे करीता मोठे व्यासपीठ व उत्कृष्ट नियोजन, राहण्याची , व जेवणाची व्यवस्था पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने स्वतः उपलब्ध करून दिली अहोरात्र ३६ तास विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धी कौशल्याचा वापर करून भारत सरकार व पर्यावरण, वन आणि हवामान बदल केंद्रीय मंत्रालयाद्वारे प्रदान केलेल्या पाच समस्यांचे निराकरण करत प्रत्येकी १,००,००० लाखाचे पारितोषिक जिंकत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन यावेळी केले.



भारत सरकार द्वारा आयोजित दोन दिवस अहोरात्र चालणाऱ्या स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २०२३ चा समारोप स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम येथे सीईओ जिल्हा परिषद अमरावती मा.अविश्यांत पांडा, पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे अध्यक्ष आमदार श्री प्रविण पोटे पाटील, पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे उपाध्यक्ष माननीय श्रेयशदादा पोटे पाटील , एआयसीटी प्रतिनिधी आनंद कुळकर्णी, पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे संचालक डॉ. डी. टी. इंगोले यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न झाला. पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅम्पस मध्ये अकरा राज्यातील सत्तावीस संघानी यावेळी सहभाग घेत भारत सरकार व पर्यावरण, वन आणि हवामान बदल केंद्रीय मंत्रालयाद्वारे प्रदान केलेल्या पाच समस्यांवर कार्य केले यात त्यांनी केलेल्या कार्याची पडताळणी करण्याकरिता एआयसीटी द्वारा निवड करण्यात आलेल्या परीक्षकांनी सर्व निकषानुसार विद्यार्थ्यांनी परिश्रम घेत केलेलं कार्य पडतडात निकाल जाहीर केला यात प्रो प्लॅनेट पर्सन अप्लिकेशन विभागात पुणे येथील विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालय , बीहेव्हिअरल मॉनिटरिंग व चेंज सिस्टीम या विभागात तामिळनाडू येथील नादर सरस्वती इंजिनिअरिंग कॉलेज , इवेस्ट अँड फॅसिलिटी लोकेटर या विभागामध्ये नोएडा येथील ब्यानेट विद्यापीठ , वॉटर अँड इलेक्ट्रिसिटी ट्रेकिंग अप्लिकेशन मध्ये वर्धा येथील बीआयटी कॉलेज त्याचप्रमाणे व्हर्चुअल झू या विभागामध्ये गाझियाबाद येथील अजयकुमार गर्ग येथील महाविद्यालयाने प्रथम पारितोषिक जिंकले , या सर्व विजेता संघाला प्रत्येकी १,००,००० रुपयाचे पारितोषिक उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. त्याचप्रमाणे या स्पर्धेचे महाविद्यालयातील संयोजक डॉ झिशान खान यांचे मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच स्पर्धेचे उच्चतम परीक्षण करणाऱ्या परीक्षकांचे सुद्धा यावेळी शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र व महाविद्यालयाच्या वतीने मानचिन्ह देण्यात आले. या कार्यक्रमाच्या नियोजन स्पर्धेचे संयोजक डॉ झिशान खान यांनि केले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी यशस्वी आयोजनाकरिता सहकार्य केले.

### विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव

नवसंशोधकांना आपल्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना स्वरूप देण्याकरिता भारत सरकार द्वारा या स्पर्धेचे आयोजन केल्या जाते यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव मिळतो तसेच विद्यार्थ्यांना नावीन्य संकल्पना समोर ठेऊन स्टार्टअप सुरू करण्याकरिता भारत सरकार द्वारा सहाय्य मिळेल तसेच उद्योग क्षेत्रात विद्यार्थ्यांचे योगदान मिळेल असे मत यावेळी अविश्यांत पांडा यांनी व्यक्त केले पुढे ते म्हणाले पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची निवड या स्पर्धेच्या आयोजनाकरिता झाल्यानंतर महाविद्यालयाने उत्कुष्ट नियोजन करत यशस्वीपणे स्पर्धा पार पाडली व अमरावती चे नावलौकिक वाढले तसेच हॅकॅथॉन सारख्या स्पर्धे करीता अमरावती येथे मोठे व्यासपीठ पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयात उदयास आले असे प्रतिपादन यावेळी अविश्यांत पांडा सीईओ जिल्हा परिषद अमरावती यांनी केले.

### भारत तंत्रज्ञान क्षेत्रात महाशक्ती बनेल

स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन मध्ये सहभागी स्पर्धकांनी भारत सरकार नि दिलेल्या समस्येवर तोडगा करण्याकरिता ३६ तास परिश्रम करत तयार केलेले अप्लिकेशन बघितल्यानंतर येणाऱ्या काहीवर्षात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात भारत तंत्रज्ञान क्षेत्रात महाशक्ती बनेल तसेच विद्यार्थ्यांच्या कला , कौशल्याला वाव देण्याकरिता स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन सारख्या स्पर्धा दरवर्षी पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित करण्यात येतील व विविध राज्यातील विद्यार्थी यामध्ये सहभाग घेतील असे प्रतिपादन यावेळी आमदार प्रविण पोटे पाटील यांनी केले.

## देशभरात २४ तासांत ६४० नवे करोनाबाधित

**दि. २२ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

करोना विषाणूचा नवीन उपप्रकार असलेल्या 'जेएन.१'चे रुग्ण देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. केरळ, महाराष्ट्र, गोव्यासह अनेक राज्यांमध्ये जेएन.१ बाधित रुग्णांवर उपचार चालू आहेत. दुसऱ्या बाजूला देशात करोनाबाधित रुग्णांची संख्यादेखील वाढू लागली आहे. संपूर्ण भारतात शुक्रवारी दुपारपर्यंत ६४० नवे करोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. एकट्या केरळ राज्यात गेल्या २४ तासांत २६५ करोनाबाधित रुग्ण सापडले आहेत. तसेच एका करोनाबाधित रुग्णाचा मृत्यूदेखील झाला आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार शुक्रवारी सकाळी आठ वाजेपर्यंत देशभरात एकूण ३२८ करोनाबाधित रुग्ण सापडले आहेत. त्यापैकी २६५ रुग्ण केरळमधले आहेत.

# १४ वा राज्यस्तरीय काव्य महोत्सव

## २४ ला काव्यप्रेमी शिक्षक मंचचे आयोजन

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

काव्यप्रेमी शिक्षक मंच महाराष्ट्र व पदव्युत्तर मराठी विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी २४ डिसेंबर रोजी विद्यापीठ परिसरातील डॉ. के. जी. देशमुख सभागृहात भव्य काव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या काव्यमहोत्सवात महाराष्ट्रातील कानाकोपर्यातून येणार्या दीडशे काव्यप्रेमींचा सहभाग राहणार

असून सोबतच संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती येथील मराठी पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांचे कविता सादरीकरण होणार आहे. या काव्य महोत्सवाच्या निमित्ताने विविध प्रकारातल्या दर्जेदार कवितांचा आस्वाद घेण्याची संधी अमरावतीकर काव्यरसिकांना उपलब्ध होणार आहे.कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्या अध्यक्षतेत आयोजित या काव्यमहोत्सवाला महोत्सवाध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक बबन सराडकर व उदघाटक म्हणून मोना चिमोटे उपस्थितीत राहतील. या काव्यमहोत्सवाच्या पूर्वसंध्येला शनिवारी २३ डिसेंबर रोजी गझल मुशायर्याचे आयोजन केलेले आहे. या कार्यक्रमात सर्व काव्यप्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत केले. पत्रकार परिषदेला काव्यप्रेमी शिक्षक मंचचे कालीदास चवडेकर, दीपक सपकाळ, विजय बिंदोड, राजेश चौरपगार, खुशाल गुल्हाने, वर्षा भांदर्गे, प्रमोद भागवत, श्याम चौकडे, कुमुद कोरडे, अंजली वारकरी, रंजना कराळे हजर होते.

# यशदा पुणे येथील अधिकारी वझ्झर भेटीवर

## अध्ययन करून घेतले पुनर्वसनाचे धडे

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक परतवाडा**

यशदा पुणे येथील वर्ग १ अधिकारी स्व. अंबादासपंत वैद्य मतिमंद अनाथ बालगृह वझ्झर जि. अमरावती बालगृहात अभ्यास दौर्यावर पोहोचले आहेत. गुरुवारला सकाळी १० वाजता प्रशिक्षणासाठी बालगृहात एकूण ६७ अधिकार्यांचे आगमन झाले. त्यामध्ये उपजिल्हाधिकारी, उप पोलीस अधिक्षक, तहसिलदार, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी आदींचा समावेश आहे.



या अभ्यास दौर्यादरम्यान त्यांनीदिव्यांग मुलांचे पुनर्वसन कसे होते आणि त्यांची अंमलबजावनी वझ्झर मॉडल प्रमाणे कशी करतात याबाबत त्यांनी अध्ययन केले. सर्व अधिकार्यांनी २ ते ३ तास अभ्यास करुन तेथील प्रसंग अनुभवला. या प्रसंगी शंकरबाबा पापळकर म्हणाले की, मंत्रालयातील प्रत्येक विभागामध्ये तसेच मंत्र्यांकडे फाईल देण्याचे संपुर्ण अधिकार आपल्या अधिका-यांच्याच हातात आहे. आचार्य विनोबा भावे यांनी म्हटले आहे सरकारी अधिकारीच देशाचे भविष्य घडवु शकतात. आज वझ्झर मॉडलच्या माध्यमातून अपंगाचे पुनर्वसन कसे करावे त्याचे प्रात्यक्षिकदाखविण्यात आले.

तसेच शंकरबाबा म्हणाले नियमानुसार १८ वर्षावरील दिव्यांगमुला-मुलींना बालगृहाच्या बाहेर काढल्या जाते ते कुठे जातात काय करतात याची माहीती सरकारी दप्तरी नाही. त्या करीता १८ वर्षावरीलदिव्यांग मुलांना आजीवनपुणर्वसनासाठी त्याच बालगृहात राहू द्यावे, असा शासनाने कायदा करावा. वझ्झर मॉडल प्रमाणे बालगृहातील सर्व दिव्यांग मुला-मुलींना वडिलांचे नाव दिले, त्यांचे आधार कार्ड, जनधन खाते, योग्य शिक्षण, २४ मुलींचेलग्न, १५ मुलांनानोकरी, बालगृहातील अंध कु. माला हीने परीक्षा, १५ हजाराच्यावर वृक्षाची लागवड, बालगृहातील मुलांनी तयार वं केलेले काष्ठशिल्प ई. आज भारताचे पंतप्रधानांकडे च योग्य सरकारी अधिकारी आहेत. म्हणुनच भारत प्रगती करीत आहे. सरकारी अधिकारीच देशाचे च भविष्य घडवूशकतात असे माझे ठाम मत आहे. असे उद्गार शंकरबाबांनी काढले. बालगृहातील सर्वप्रसंगपाहुन अभ्यासाकरीता आलेले सर्व अधिकारी वर्गगहीवरूनगेले. याकार्यक्रमाचे अध्यक्ष उंबरकर साहेब एसडीओ अचलपुर, कार्यक्रमाचे संचालन विवेक काळकर उपजिल्हाधिकारी अमरावती यांनी केले तर आभार प्रदर्शन सागर देशमुख डीवायएसपी/एसीपी यांनी केले.

# ३१ डिसेंबर साठी पोलीस प्रशासन ऍक्टिव्ह मोडवर

## २५ डिसेंबर पासून शहरात वाढणार पोलीस बंदोबस्त

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आगामी ३१ डिसेंबरचा जल्लोष शांततेत पार पडावा म्हणून सीपी नवीनचंद्र रेड्डी आत्तापासूनच ॲक्शन मोडवर आले आहे. शहरात २५ डिसेंबरपासूनच ठिकठिकाणी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहणार आहे. याबाबत सीपींनी आज पोलीस आयुक्त कार्यालयातील सभागृहामध्ये सर्व ठाणेदारांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक सूचनादेतमार्गदर्शन केले. सीपीनवीनचंद्ररेड्डी यांच्या नेतृत्वात शहर पोलीस दलातील वरिष्ठअधिकारी व संपूर्ण पोलिसांनी हनुमानगढी येथे पार पडलेल्या शिवमहापुराण कथेचा नियोजनबध्द पध्दतीने उत्कृष्ट बंदोबस्त केला. काही तुरळक चोरीच्या घटना सोडल्या तर संपूर्ण कार्यक्रम, वाहतूक व्यवस्था, नागरिकांची सुरक्षा हे सर्व शांततेत पार पडले. आगामी २५ डिसेंबरला ख्रिसमस, १ जानेवारीला शहरांत भिमा कोरेगाव स्मारक अभिवादनचे आहे.म्हणून ३१ डिसेंबर शांततेत पार पडण्यासाठी सीपींनी अ आज शहरातील सर्व डीसीपी, एसीपी, ठाणेदारांची बैठक घेतली. २५ म डिसेंबरपासून ते २ जानेवारी पर्यंत शहरात ठिकठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त लावण्यात येणार आहे. ३१ डिसेंबरला सीपींसह सर्व ठाण्यातील रात्रभर ऑनरोड राहतील. शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व मार्गावर नाकाबंदी, प्रमुख चौकांमध्ये फिक्स पाईन्ट, विविध पथकांची गस्त होईल. या सर्व बाबींबाबत सीपींनी ठाणेदारांना सूचना दिल्या. तसेच प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत पायदळ गस्त, वाहनांची गस्त होईल. विशेष म्हणजे रेकार्डवरच्या आरोपींची झाडाझडती घेऊन उपद्रवींना तिन्ही दिवशी स्थानबध्द करून ठेवण्यात येणार आहे.

# सी सी आय द्वारा सुरू झाली येवदा येथे कापूस खरेदी

## सभापती सुनील पाटील गावंडे यांच्या हस्ते झाला शुभारंभ



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**

दर्यापूर तालुक्यात कापसाचा पेरा जास्त असल्याने यावर्षी सर्वत्र शेतामध्ये पांढरे सोने ` असल्याने शेत्र सर्व पांढरे झालेले आहेत त्यातच मजूर भेटत नसल्याने खूपच अडचण होत आहे अशातच आता येवदा येथील सातपुडा उद्योग येवदा येथे सीसीआय (भारतीय कपास निगम) मार्फत कापूस खरेदीचा शुभारंभ आज सकाळी ११ वाजता मुन्ना शेठ अग्रवाल यांच्या सातपुडा उद्योग येवदा येथे कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूरचे सभापती सुनील पाटील गावंडे यांच्या शुभहस्ते तर उपसभापती राजीव पाटील कराळे, माजी सभापती साहेबराव जी भदे, माजी प स सभापती प्रदीप बापू देशमुख कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक प्रभाकर पाटील तराळ आसिफ भाई पैलवान, राजेश कमलकिशोर राठी, भारतीय कपास निगम शाखा अकोला केंद्र येवदा कमर्शियल ऑफिसर शेतकरी कोण आहे दत्तात्रय कदम आदी मान्यवरांच्या उपस्थितीत कापूस खरेदीचा शुभारंभ झाला सभापती सुनील पाटील गावंडे यांच्या हस्ते प्रथम शेतकरी यांचा नारळ दुपट्टा देऊन सत्कार करण्यात आला शेतकऱ्याला चांगला भाव सीसीआय तर्फे देण्यात येणार असून ६९२० रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात येणार असून सर्व शेतकऱ्यांनी ऑनलाइन बुकिंग करणे महत्त्वाचे असून ही त्याकरिता सातबारा आधार कार्ड वेळापत्रक जोडणे आवश्यक आहे व सर्वांनी या जोडणीचा फायदा घ्यावा असे आवाहन भारतीय कपास निगम शाखा दर्यापूरचे कमर्शियल ऑफिसर दत्तात्रय कदम यांनी केले आहे.

# प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या डॉक्टरवर भरोसा नाही का?

**दि२२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये उपचाराच्या सुविधा असल्यातरी बहुतांश रुग्णांचा कल हा शहरी भागाकडे दिसून येते. त्यामुळे ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या डॉक्टरवर भरोसा नाही का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील ग्रामीण भागातीलपरिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसूतीचे प्रमाण कमी झाले आहे. ग्रामीण भागातील महिलांचा थेट जिल्हास्तरीय रुग्णालय किंवा खासगी रुग्णालयामध्ये प्रसूती करण्याकडे कल आहे. शासन स्तरावरून ग्रामीण भागात गावातचआरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने १५ किलोमीटर अंतरावर प्राथमिक आरोग्य केंद्राची किंवा उपकेंद्राची स्थापना करण्यात आली आहे.लपरिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुविधा उपलब्ध नाहीत. त्यापेक्षाही उपकेंद्राची सुविधा तर काही बिकटच आहे. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल होण्याऐवजी थेट जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन प्रसूती केली जात आहे.

अनेकवेळा पहेला येथून प्राथमिक आरोग्य केंद्रातूनच प्रसूतीसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी रेफर केल्या गेल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात मनुष्यबळ, मेडिसिन व इतर सुविधांचा अभाव असतोच. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तज्ज्ञ डॉक्टर नाहीत. जिल्ह्याच्या ठिकाणी उपचार केला जातो. या शिवाय सुविधांचा अभाव असल्याने न. प्राथमिक आरोग्य केंद्र प्रसूतीची ही टक्केवारी कमी दिसून येते.

ग्रामीण भागातून ७५ टक्के जिल्हा रुग्णालयाकडे रेफरचे प्रमाण अधिक आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी महिला रुग्णालयामध्ये रेफरचे प्रमाण सर्वाधिक आहे. ग्रामीण भागातून महिला प्रसूतीसाठी महिला रुग्णालयाला सर्वाधिक प्रसंती देतात. चांगली सुविधा मिळावी यासाठी खासगी रुग्णालयात जास्त ओढ असते. शासनाकडून गोरगरीब रुग्णांवर आरोग्यावर लाखो रुपये खर्च केल्या जात आहे. चांगल्या सुविधा मिळण्यासाठी शासनस्तरावरून प्राथमिक आरोग्य केंद्राची निर्मिती केली गेली. परंतु शासन स्तरावर अपयश दिसून येते.

# डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय कृषि प्रदर्शनी २०२३ ठरणार शेतकऱ्यांसाठी वरदान

## विदर्भात पहिल्यांदाच लाईव्ह शेती प्लॉट प्रदर्शनात पहायला मिळणार सोबतच कृषि चर्चासत्र व परिसंवाद आणि चला हवा येऊ द्या व पुन्हा मिरासदारी असे मनोरंजक कार्यक्रम

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालीत श्री शिवाजी कृषि महाविद्यालय, अमरावती आणि कृषि विभाग व कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा अमरावती, सह प्रायोजक जैन इरिगेशन सिस्टम्स् लि. द्वारा आयोजित कृषिरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंती निमित्त राष्ट्रीय कृषि प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर राष्ट्रीय कृषि प्रदर्शनाला कार्यक्रमाध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री हर्षवर्धन देशमुख, उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री मा. ना. श्री. धनंजय मुंडे, मुख्य अतिथी म्हणून भारतीय कृषि शास्त्रज्ञ निवड मंडळ (भा.कृ.अ.प.) दिल्ली चे माजी अध्यक्ष मा. डॉ. सी. डी. मायी तसेच विशेष उपस्थितांमध्ये दिव्यांग कल्याण मंत्रालय अध्यक्ष ओमप्रकाश उर्फ बच्चु कडु, लोकसभा सदस्य मा. सौ. नवनित राणा, लोकसभा सदस्य रामदास तडस, राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, विधानसभा सदस्य ॲड. यशोमतीताई ठाकूर, रवि राणा, सौ. सुलभाताई खोडके, राजकुमार पटेल, बळवंत वानखडे, प्रताप अडसड, देवेंद्र भुयार, विधान परिषद सदस्यप्रविण पोटे पाटील,किरण सरनाईक, धिरज लिंगाडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आत्मा सौरभ कटीयार (भाप्रसे), मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती अविश्यांत पंडा (भाप्रसे), जैन इरिगेशन चे अध्यक्ष अशोक जैन, विभागीय कृषि सहसंचालक किसन मुळे, कृषि प्रदर्शन आयोजन समिती अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले व उपाध्यक्ष, कार्यकारी सदस्य श्री शिवाजी क्षण संस्था, अमरावती इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शेतकऱ्यांचे कैवारी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी पहिल्या जागतिक कृषि प्रदर्शनाचे आयोजन १९५९-६० मध्ये दिल्ली येथे केले होते, ही प्रेरणा घेऊन श्री शिवाजी कृषि महाविद्यालयाच्या भव्य प्रक्षेत्रात आयोजित ४ दिवसीय कृषि प्रदर्शनाचे आयोजन शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने दि २७ ते ३० डिसेंबर २०२३ रोजी श्री शिवाजी कृषि महाविद्यालय मोर्शी रोड, अमरावती येथे करण्यात येत आहे.

कृषि महाविद्यालयाने प्रायोगिक तत्वावर फुलवलेली शेती येथे शेतकऱ्यांना प्रत्यक्षात बघण्यास मिळणार असून त्या अनुशंगाने त्यांच्या शंका व त्या निमित्ताने आवश्यक असणारी तांत्रिक माहीती व शेती विषयक माहिती येथे तंत्रज्ञ करुन देणार आहेत. जवळपास ७० एकर च्या परिसरामध्ये भव्य प्रदर्शनीचा लाभ समस्त शेतकरी बांधवांनी घेवून अत्याधुनिक शेतीची कास धरावी याउद्देशाने या कृषि प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी आधुनिक शेती करुन आपले उत्पन्न कसे वाढवावे याकरीता या प्रदर्शनीमध्ये नामवंत शास्त्रज्ञ, प्रयोगशील शेतकरी, कृषि व्यावसायिक यांच्या कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या असून कृषि विभागाचे व इतर अधिकारी वर्ग भेट देऊन मार्गदर्शन करतील. या प्रदर्शनीमध्ये देशभरातील कृषिशी संबंधित माहिती व तंत्रज्ञान आणि नवनवे प्रयोग शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. त्यामध्ये प्रामुख्याने कृषि उत्पादन तंत्रज्ञान, माती आणि पाणी सिंचन प्रणाली, सुधारित बियाणे व संकरित बियाणे, जैव कीटकनाशके आणि जैव नियंत्रक घटक, जैव तंत्रज्ञान, खते व्यवस्थापन, सेंद्रिय निविष्ठा, दुग्धशाळा उपकरणे आणि उत्पादने, फळे, फुले व भाजीपाला संबंधी हायटेक तंत्रज्ञान, अन्न प्रक्रिया व पॅकेजिंग, कृषि आधारित मॉडेल, माहिती तंत्रज्ञान, कृषी यांत्रिकी व अवजारे, सोलर ऊर्जा, कुंपण व जलसिंचन यंत्रणा, बचत गटांचा सहभाग, पशू प्रदर्शनी, देशी विदेशी विविध जातींच्या गायी, म्हशी, शेळी मेंढी, शेतीपूरक उद्योगधंदे यांची माहिती तसेच जैन इरिगेशन सिस्टम्स् लि. तर्फे हायड्रोपोनिक्सची सविस्तर माहीती शेतकऱ्यांना करुन देण्यात येणार आहे, गांडूळ खत, बायोगॅस बद्दलची माहीती तसेच कृषि तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, खते, कीटकनाशके, ट्रॅक्टर अद्यावत उपकरणे, सिंचन उपकरणे, रिफ्रेशमेंट, उपहारगृह, फुडझोन यांचे स्टॉल राहतील.

रक्तदान ही जनसामान्यांची सेवा, यालाच मानूया ईश्वरसेवा.

# आईची जात मुलांना लागू केल्यास मोठा घोळ निर्माण होईल : बच्चू कडू



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक नाशिक**

आईच्या जातीच्या दाखल्याच्या आधारावरून मुलांनाही प्रमाणपत्र देण्याची मागणी मराठा नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केली आहे. यावर आमदार बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. आईची जात मुलांना लागू केल्यास देशात मोठा घोळ निर्माण होईल, असं बच्चू कडूंनी म्हटलं होतं. बच्चू कडूंच्या विधानावर जरांगे-पाटलांनी भाष्य केलं आहे.

**बच्चू कडू काय म्हणाले?**

आपली पुरूषप्रधान संस्कृती आहे. वडिलांची जात मुलाला आणि मुलीला लागू शकते. पण, आईची जात मुलांना लागू होत नाही. हा बदल फक्त एका जातीत होणार नाही, तर सगळ्यांसाठी करावा लागेल. आईची जात मुलांना लागू केल्यास देशात मोठा घोळ निर्माण होईल, असं मत बच्चू कडूंनी मांडलं.

**जरांगे-पाटलांनी काय म्हटलं?**


जरांगे-पाटील म्हणाले, बच्चू कडूंकडून ही अपेक्षा नाही. शिष्टमंडळाशी चर्चा करताना बच्चू कडूही उपस्थित होते. बच्चू कडूंनी खरे आहे, ते बोलावं.

**मराठा आणि कुणबी एकच**

सरकारच्या शब्दाचा मराठा समाज सन्मान करत आहे. त्यामुळे नोटीसा बजावून विनाकारण मराठ्यांना डिवचू नये. २४ डिसेंबरपर्यंत मराठ्यांच्या नोदी आढळल्या आहेत. मराठा आणि कुणबी एकच असल्याचं सिद्ध झालं आहे, असं जरांगे-पाटलांनी म्हटलं.

# मेहंदीचा ट्रेंड बदलला; नवरा लग्नाआधीच नवरीच्या मुठीत

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



दिवाळी सण आटोपताच तुळशी विवाह साजरा करण्यात येतो. त्यानंतर लग्नसराईला सुरूवात होते. यासाठी जोडीदाराला खुश करण्यासाठी पोर्ट्रेट मेहंदींचा ट्रेन्ड सध्या जोमात सुरू आहे. लग्नाआधीच नवरीच्या मुठीत नवरा असावा असे चित्र मेहंदीच्या माध्यमातून केले जात आहे.

लग्नसराई सुरू झाली की नवनवीन पद्धतीच्या लहेंगा, शेरवाणी, कपड्यांच्या डिझाईमध्ये बदल होत असतो. अशाच पद्धतीने मेहेंदीचा ट्रेन्डही बदलत आहे. सध्या पोर्ट्रट मेहंदीचा ट्रेंड क्रेझ वाढली आहे. जोडीदारासोबत फोटो तळहातावर काढण्यासाठी आर्टिस्टकडे मागणी वाढू लागली आहे. लग्नापुर्वी वधु-वरांच्या हातावर मेहंदी लावण्याचीपद्धत खूप जुनी आहे. विवाहात वधूला मेहंदी लावून विधी पूर्ण करतात. परंतु आता पुर्वीच्या मेहंद ट्रेन्डमध्ये बदल झाला असून नवीन फॅशन रूढ होत आहे. सध्या पोर्ट्रट मेहंदीला अधिक पसंती दिली जात आहे. चक्क नवरीच्या हातात नवरदेवाचा फोटो हातावर काढला जात आहे.

मागील काही वर्षांपासून पोर्ट्रेट मेहंदीची मागणी वाढली असून लग्नसराईत वधू आणि वर वर्षांपासून पोर्टेट मेहंदिला अधिक पसंती देत आहेत.यासाठी तज्ञ मेहंदी लावणाऱ्या महिलांची चंगळ आहे.

**कशी काढली जाते ही मेहंदी?**

ब्रॉयडल प्रोटेट मेहंदीमध्ये डिझाईन निवडणे अतिशय महत्वाचे असते. यामध्ये वधूचा फोटो स्केच स्टीकर किंवा रेखाचित्र वापरले जाते. डिझाइनचे स्टॅन्सिल तयार करून एक आकर्षक आणि अद्वितीय कलाकृती केली जाते.

**काय आहे पोर्ट्रेट मेहंदी?**

पोर्ट्रेट मेहंदीमध्ये छायाचित्र साकारता येते. लग्नाच्या दिवशी किंवा लग्नाच्या एकदिवस आधी मेहंदी हातावर काढली जाते. सण-उत्सवाच्या प्रासंगीक छाया- चित्रांसह मेहंदी काढण्याकडे कल वाढला आहे. अलीकडे लग्न लव मॅरेज असो की अरेंज मॅरेज असो. वधू-वरांची छायाचित्रे दर्शविणारी आणि आकर्षक दिसण्यासाठी पोर्ट्रेट मेहंदी अधिक पसंती दिली जात असल्याचे जिल्ह्यातील लग्नसमारंभातून दिसून येते.

**दोन हातांचा खर्च ती?**

ज्या डिझाईन पूर्ण होण्यासाठी बरचे तास लागतात. साधारणतः वधूच्या मेहंदीला चार ते पाच तास तर वराच्या मेहंदीला दोन तास लागतात. वधूच्या मेहंदीला चार ते पाच हजार तर वराला एक ते दोन हजार रुपये खर्च लागतो.

> आता मेहंदीचे नवनवीन प्रकार आलेले आहेत. त्यामधून जरीन, सटक व सोबतच पोर्ट्रेट मेहंदी काढण्याकडे कल वाढलेला आहे. पुर्वी जब्बा आणि कावेरी मेहेंदीचा वापर केला जात होता.
>
> **कविता पवार**
> **मेहंदी आटिस्ट**

# मुबलक साठा असूनही अमरावतीकरांना दिवसाआड पाणी

## पाणीपुरवठा प्रकल्पाच्या प्रकल्पाला केंद्र सरकारच्या मान्यतेची प्रतीक्षा

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत अमरावती शहराचा ९८५.४९ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या प्रकल्पाला केंद्र सरकारच्या मान्यतेची प्रतीक्षा आहे. पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असूनही दिवसाआड पाणी, कमी दाबाचा पाणी पुरवठा, नळ जोडण्यांची संथगती यामुळे अमरावतीकर त्रस्त आहेत.

अमरावती पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर अमरावती महापालिकेने सादर केला होता. या प्रकल्पाची मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीने केंद्र सरकारच्या शिखर समितीकडे शिफारस केली आहे. आता केंद्र सरकारच्या अंतिम मंजुरीनंतरच या प्रकल्पाचे काम पुढे सरकू शकेल. अमरावती शहराला अप्पर वर्धा धरणातून



पाणी पुरवठा केला जातो. अमरावतीकरांची तहान भागेल इतका पाणीसाठा धरणात उपलब्ध आहे. तरी अमरावतीकरांना अपुऱ्या व अर्धवट पाणी पुरवठ्याची झळ सहन करावी लागत आहे.

अप्पर वर्धा धरण मोर्शी ते नेरपिंगळाई पर्यंतची डब्लूटीपी जलवाहिनी जुनी लोखंडी असून शिकस्त झाली असून जलवाहिनी फुटली तर अमरावतीचा पाणी पुरवठा चार ते पाच दिवस बंद राहतो असे चित्र आहे. त्यामुळे नजीकच्या गावांना सुद्धा पाणी पुरवठा होत नाही. ही गैरसोय टाळण्यासाठी अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना अमृत २.० अभियाना अंतर्गत सिंभोरा हेडवर्क्स ते नेरपिंगळाई संतुलन टाकी पासून पुढे तपोवन जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत मृदू पोलादी जलवाहिनी अंथरण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता, त्यासाठी आमदार सुलभा खोडके यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

सध्याच्या अंथरलेल्या १५०० मिलीमीटर व्यासाच्या पी.एस.सी. गुरुत्ववाहिनीवर सातत्याने गळतीचे प्रमाण वाढत आहे. सदर गळत्या ह्या मुख्यत्वेकरून जलवाहिनी मधील तार गंजल्यामुळे व वाहिनी निकामी झाल्याने लागल्या आहेत. सध्या अस्तित्वातील जुनी पी.एस.सी. गुरुत्ववाहिनी १५६ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करण्यासाठी संकल्पीत असून त्यामधून सद्यस्थितीत १२३ दशलक्ष लिटर पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

# कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचा व्यवस्थापन परिषदेतर्फे सत्कार

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचा बुधवारी २० डिसेंबर, २०२३ रोजी पार पडलेल्या व्यवस्थापन परिषद सभेत सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी गेल्या फेब्रुवारी महिन्यात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू म्हणून पदभार हाती घेतला. अवघ्या अकरा महिन्याच्या कार्यकाळात कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी विद्यापीठ विकासाच्यादृष्टीने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. अनेक योजना त्यांनी आखल्या आणि यशस्वीपणे राबविल्या जात आहेत. येत्या ३१ डिसेंबर,२०२३ रोजी त्यांचा कार्यकाळ संपणार आहे. २० डिसेंबर रोजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा पार पडली. या सभेत कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. हर्षवर्धन देशमुख, डॉ. रविंद्र कडू, डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. व्ही.एम. मेटकर, डॉ. आर.डी. सिकची, डॉ. एच.एम. धुर्वे, डॉ. व्ही.एच. नागरे, श्री ए.एम. बोर्डे, डॉ. एस.व्ही. डुडुल, डॉ. व्ही.पी. गुडधे, डॉ. तनुजा राऊत, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, डॉ. नितीन कोळी, सौ. मोनाली तोटे पाटील आदी उपस्थित होते.

# शेतमाल खरेदीत हिंगणघाट बाजार समिती अव्वल, तब्बल ११ लाख क्विंटलची खरेदी



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक वर्धा**

दिवाळीनंतर शेतकऱ्यांनी आपला शेतमाल बाजारात विक्रीसाठी आणणे सुरू केले. त्यात माल विकण्यास हिंगणघाट बाजार समितीला प्राधान्य मिळाल्याचे दिसून येते. ही बाजार समिती विदर्भात सोयी सुविधांबाबत अव्वल समजली जाते.

हिंगणघाट बाजार समितीत या हंगामात माल विकण्यास गर्दी झाली. सोयाबीन ३ लाख ५९ हजार क्विंटल, कापूस ५७ हजार क्विंटल, तूर ६ लाख ६६ हजार क्विंटल, असा शेतमाल हिंगणघाट बाजार समितीत आला. जिल्ह्यात वर्धा, पुलगाव, सींदी, हिंगणघाट, समुद्रपुर, आर्वी, आष्टी, अशा सात बाजार समित्या आहेत. उर्वरित बाजार समितीतील आवक तुलनेने बरीच कमी असल्याची आकडेवारी पुढे आली आहे.

प्रामुख्याने आता कापसाची आवक वाढू लागली आहे. भाव वाढण्याचा अंदाज व्यक्त होत असल्याने बऱ्याच शेतकऱ्यांनी आपला कापूस विक्रीस आणलेला नाही. सध्या कापसाला चार ते सव्वा पाच हजार रुपये प्रती क्विंटलला भाव मिळत आहे.

# आकोटात २३ डिसेंबरला राज्यस्तरीय शेतकरी काव्य परिषदेचे आयोजन

## लोकजागर मंच व प्रतिभा साहित्य संघाचा सामाजिक उपक्रम

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक आकोट**

लोकजागर मंचचे संस्थापक अध्यक्ष अनिल गावंडे आणि प्रतिभा साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल कुलट यांच्या संयुक्त विद्यमाने आकोट येथे शनिवार, दिनांक २३ डिसेंबर रोजी,सकाळी १०-३० वाजता, झुनझुनवाला अतिथीगृहात राज्यस्तरीय शेतकरी काव्य परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांचे कैवारी,कृषिरत्न,शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंती पर्वाचे औचित्य साधून या शेतकरी काव्य परिषदेचे राज्यस्तरीय आयोजन करण्यात आले आहे.सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांची चहुबाजूने हेळसांड होत आहे.बी बियाणे, खते, औषधी, मजुरांची मजूरी इत्यादींचे बाजारभाव प्रचंड प्रमाणात वाढले आहेत.




त्यामानाने शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल कवडीमोल भावाने विकावा लागत आहे.शेतकऱ्यांना शेती व्यवसाय करणे अजिबात परवडून राहीला नाही.शेतीचा धंदाच तोट्यात आल्याने तो हैराण,हतबल व हवालदिल झाला आहे.त्यांच्या आत्महत्यांना आवर घालण्यासाठी साहित्यिकांनी पुढाकार घेणे जरुरीचे आहे.

शेतकऱ्यांच्या या अवघ्या प्रश्नांना वाचा फोडून त्या सरकारच्या कानावर घालण्याची जबाबदारी साहित्यिकांची आहे.साहित्य हे राजकीय,सामाजिक परिवर्तनाचं प्रभावी माध्यम आहे. त्यासाठीच ही शेतकरी काव्य परिषद आयोजित करण्यात आली आहे.ही परिषद सकाळ आणि दुपार या दोन सत्रात होईल.त्यासाठी शेतकऱ्यांच्या सुखदुःखाला उजागर करणाऱ्या साहित्यिकांना निमंत्रित करण्यात आले असून यामध्ये दंगलकार नितीन चंदनशिवे, विजय सोसे,अनंत राऊत, गजानन मते,किशोर बळी,नितीन वरणकर इत्यादी नामवंत कवी,लेखकांना निमंत्रित करण्यात आले आहे.त्यासोबतच प्रगतशील शेतकरी व शेतीची उद्योगधंद्यासोबत सांगड घालणाऱ्या उद्योजकांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. बाबासाहेब ठाकुर,अकोला जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष जमीरउल्लाखा पठाण,नंदकीशोर शेगोकार,डॉ.कफील शेख, गजाननराव गावंडे, देऊळगाव, सोनू अग्रवाल, विठ्ठलराव नारे,सैय्यद रफत अली, विजय दातीर,प्रभाकरराव पांडे, विजय सेदाणी,आनंद भोरे, इत्यादींसह परिसरातील शेतकऱ्यांनाही सपत्निक आमंत्रित करण्यात आले आहे.